सेव्हींग व करंट खात्यांवर मिळवा 7% व्याजदर
दि जैन मर्चन्टस् को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि.
इमारत कंपनी, पोस्ट ऑफिस जवळ, कापड बाजार, अ.नगर. फोन नं. : 0241-2993900
श्री. संजय कटोडे (संस्थापक) Mo. 9372444001

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

सुवर्ण विश्वातील सर्वात जूनी.. विश्वसनीय व नामांकित पेढी...
मे. हरीभाकाजी देडगांवकर
Since 1935
सराफ ॲण्ड ज्वेलर्स
२५७१, एम.जी.रोड, कापड बाजार, अहमदनगर. फोन : २३४६४४३. मो. ९८२२९९१०२४.

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शनिवार दि. ११.०७.२०२६ | अंक नं. ०८७ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

स्मार्ट असो वा मार्ट..मिल असो वा मॉल... सर्वात स्वस्त देणार फक्त राजपाल !
आला रे आला राजपाल सेल आला..!
खरेदी | खरेदीवर पॉईंट | पॉईंटसवर गिफ्ट
30 ते 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल
संगमनेर (02425) 222226
अहिल्यानगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

92.5% शुध्द चांदीमधील अप्रतिम दागिन्यांची असंख्य व्हरायटी
लेडिज अंगठी | फॅन्सी टॉप व रिंगा | लेडिज ब्रासलेट | फॅन्सी गंठन व नेकलेस | कडली | घड्याळ
साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
92.50 शुध्द चांदीपासुन बनविलेले खास आपल्या लाडक्या लहान बालगोपाळांसाठी
चांदीमधील कार्टुन ग्लास, कडली, फुलपात्र, चमचा, ताट, वाटी, बाटली, कडे, पैंजण, वाळे, तोडे, मग आणि बरचं काही..

# नगर-दौंड महामार्गावर दोन ट्रकची समोरासमोर धडक; इंधन टाकीचा स्फोट झाल्याने लाखोंचा माल जळून खाक



नगर – दौंड महामार्गावर खंडाळा शिवारात २ मालट्रकची धडक झाल्यावर दोन्ही वाहनांना लागलेली आग छायाचित्रात दिसत आहे.

नगर – नगर-दौंड महामार्गावर खंडाळा शिवारात ११ जुलै रोजी पहाटे ५.४५ च्या सुमारास दोन मालट्रकची समोरासमोर धडक होवून भीषण अपघात झाला. त्यानंतर काही क्षणातच दोन्ही ट्रकने पेट घेतला. ही आग मोठ्या प्रमाणात भडकली. त्यामुळे आगीच्या ज्वाला आणि धुराचे लोट लांबपर्यंत दिसत होते. या अपघातात एक ट्रक चालक गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचार सुरु आहेत. आगीत दोन्ही ट्रक व त्यामधील माल जळून खाक झाला असून लाखोंचे नुकसान झाले आहे.

खंडाळा परिसरात माजी जिल्हा परिषद सदस्य संदेश कार्ले यांच्या घरासमोर हा अपघात झाला. एक मालट्रक (क्र. एमएच १६ एई ०८६०) नगर एमआयडीसीमधील कंपनी मधून लोखंडी जॉब घेवून दौंडकडे तर दुसरा मालट्रक (क्र.एमएच १८ बीझेड ७३५२) कापडाचे गठ्ठे घेवून दौंडकडून नगरमार्गे धुळ्याकडे चालला होता.पहाटे ५.४५ च्या सुमारास दोन्ही ट्रकची धडक झाली. अपघाचा आवाज आल्यानंतर कार्ले कुटुंबीय व नागरिक मदतीसाठी धावले. नगरच्या मालट्रकचा चालक सोमनाथ नागरगोजे (रा. वडगाव, ता. पाथर्डी) हा केबिनच्या काचा फोडून बाहेर पडला. तर धुळ्याकडे चाललेल्या ट्रकचा चालक संजय दावर (रा.शिरपूर, सेंदवा, मध्यप्रदेश) यास संदेश कार्ले व इतरांनी केबिनमधून बाहेर काढले, तो गंभीर जखमी असल्याने स्वतःच्या गाडीतून उपचारासाठी नगरला पाठविले.

अपघातानंतर काही वेळात एका ट्रकच्या इंधनाच्या टाकीचा स्फोट होवून दोन्ही वाहनांना आग लागली. कार्ले यांनी तात्काळ अहिल्यानगर महापालिकेच्या अग्निशमन विभागाला व पोलिसांना कळवले. ट्रकमध्ये कापड झाल्याने आगीने काही वेळातच रौद्र रूप धारण केले. अग्निशमन दलाच्या दोन गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. त्यांनी आग विझविण्याचे प्रयत्न सुरु केले. कार्ले यांनी त्यांच्या शेतातील वीज पंप सुरु करून या गाड्यांना पाण्याचा पुरवठा केला. एक ते दीड तासांच्या परिश्रमानंतर आग विझली. मात्र तो पर्यंत दोन्ही वाहने आणि त्यातील साहित्य जळून खाक झाल्याने लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. नगर तालुका पोलिसांच्या पथकाने घटनास्थळी धाव घेत अपघातग्रस्त वाहने जेसीबीच्या सहाय्याने व कार्ले तसेच इतरांच्या मदतीने बाजूला करत वाहतूक सुरळीत केली. **(पुढील मजकूर पान २ वर)**

कॅमल सुपरफाईन शाबुदाणा
उपवासाची कारणे अनेक, शाबुदाणा मात्र एक..
1 किलो | 500 ग्रॅम | 250 ग्रॅम पॅकिंगमध्ये उपलब्ध
कॅमल इन्स्टन्ट शाबुदाणा 1KG पॅकमध्ये उपलब्ध
सर्व किराणा दुकानात उपलब्ध
स्टॉकिस्ट
अशोक बन्सीलाल पारख
कॅमल हाऊस, आडते बाजार, अहिल्यानगर
(0241) 2343896/2341196

Become a COMPUTER PROFESSIONAL
An ISO 9001:2015 Certified
DISHA COMPUTER INSTITUTE
PROGRAMMING
- SOFTWARE DEVELOPMENT
- DATA ANALYST & DATA SCIENCE
- FULL STACK DEVELOPMENT
DIPLOMA COURSES
- 2D & 3D ANIMATION
- ADVANCE ACCOUNTING
- CAD TRAINING PROGRAM
www.dishagroup.in
दिल्ली गेट शाखा 9371051769 | जुने बस स्टँड शाखा 9371151769 | पाईपलाईन शाखा 7447761769

बाळांच्या वजन, उंची, भूक व प्रतिकारशक्ती वाढण्यासाठी आजच भेट द्या.
सन-२०१० पासून
चिरायु लहान मुलांचे क्लिनिक
(जन्मापासून ते १८ वर्षापर्यंत)
प्रसिध्द बालरोग तज्ञांचा सल्ला
शाखा १ – सबजेल चौक, तुळजाभवानी मंदिरासमोर (डायमंड बेकरी समोर) अहिल्यानगर
9527931384 / 8830400170

पाऊल टाका स्टाईलमध्ये!
आमच्याकडे उपलब्ध पादत्राणांचे प्रकार
पुरुषांसाठी पादत्राणे । महिलांसाठी पादत्राणे । मुलांसाठी पादत्राणे
क्रॉक्स (Crocs), क्लॉग्स स्लायडर्स, फ्लिप-फ्लॉप्स, स्नीकर्स,कॅज्युअल शूज, ब्रँडेड पादत्राणे, फॉर्मल शूज, स्पोर्ट्स शूज, फ्लोटर्स, घरातील वापरासाठी चप्पल, बाहेरील वापरासाठी चप्पल व शूज वरांसाठी (ग्रूम) पादत्राणे वधूसाठी (ब्रायडल) पादत्राणे, मोजडी, कोल्हापुरी चप्पल..
खास मान्सून धमाका! ही जाहिरात दाखवा आणि प्रत्येक खरेदीवर मिळवा १०% सूट!
१००% ओरिजनल लेदर आणि कोल्हापुरी चपला
फॅशन आणि मजबुतीचा पत्ता!
Liberty SHOES लिबर्टी शूज एम. जी. रोड, कापड बाजार, अहिल्यानगर.
SHOE PALACE शू पॅलेस सारडागल्ली,अ.नगर मो : 9881531536

द्वितीय पुण्यस्मरण
स्व. मनोहर लालचंद चुग
स्व. ता. ११/०७/२०२४
सब कुछ होने के बावजुद भी कुछ भी नही है।
ऐसा लगता है आपके बिना यह परिवार खाली है।
आपके पावन स्मृती को भावपूर्ण श्रध्दांजली...
- शोकाकूल -
कमलेश मनोहर चुग (मुलगा) चंदू चुग (भाई)
समस्त चुग परिवार
फर्म : गुरुनानक रेडिमेड स्टोअर्स एनएक्स
मोचीगल्ली, अहिल्यानगर

पुण्यानुमोदन
बौद्ध संस्कार संघाचे महाउपासिका
स्मृतिशेष उषा मिराजी साळवे
(निर्वाण : ७/७/२०२६), रा.निर्मलनगर यांचा
पुण्यानुमोदन व जलदान विधी
ठिकाण : इंद्रायणी लॉन्स, नगर-छ.संभाजीनगर हायवे, अहिल्यानगर.
- शोकाकुल -
एम. बी. साळवे (पती)
समस्त साळवे परिवार

उज्वल स्टोन क्रेशर & सप्लायर्स
या फर्मचा भव्य
उद्घाटन समारंभ
रविवार दि.१२ जुलै २०२६ रोजी सकाळी १०.३० वा.
*शुभहस्ते*
मा.श्री.डॉ.सुजयदादा विखे पाटील
* प्रमुख उपस्थिती *
* आपले विनित *
श्री.अरुण भाऊसाहेब मुंढे | श्री.उदय भाऊसाहेब मुंढे | श्री.गुलाब आप्युबखान पठाण
नगर-पाथर्डी रोड, मदडगाव, ता. नगर, जि. अहिल्यानगर
मो.नं. ९८५०११२८३२, ७७५६९०६३७०, ९६०४१७५८५८

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

फोन–२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

# जिल्हा बँकेसाठीच्या ठरावाबाबतची तक्रार निकाली काढण्यासाठी १० हजारांची लाच घेताना सहाय्यक निबंधकास रंगेहाथ पकडले

नगर – विविध कार्यकारी सेवा सोसायटीने जिल्हा बँकेसाठी केलेल्या ठरावाबाबत आलेली तक्रार निकाली काढण्यासाठी आणि प्रकरण मिटवण्यासाठी १० हजार रुपयांची लाच स्वीकारताना अहिल्यानगर जिल्ह्यातील कर्जत येथील सहाय्यक निबंधक (सहकारी संस्था, वर्ग २) मिलिंद प्रल्हादराव राऊत यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने १० जुलै रोजी रंगेहाथ पकडले आहे. या कारवाईमुळे सहकार वर्तुळात प्रचंड खळबळ उडाली आहे.

या प्रकरणातील तक्रारदार हे एका विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे सचिव आहेत. जिल्हा बँकेच्या निवडणुकीसाठी सोसायटीने मतदानाचा अधिकार कोणाला द्यावा, याबाबत ठराव करून तो प्रस्ताव सहाय्यक निबंधक यांच्याकडे सादर करायचा होता. त्यासाठी गावातील सोसायटीच्या सचिवांनी सर्व संचालकांची बैठक बोलावली होती व सर्वांना नोटिसाही पाठवल्या होत्या. मात्र, एक संचालक पुणे येथे राहत असल्याने त्यांना नोटीस मिळाली नव्हती. बैठक पार पडली आणि ठराव मंजूर झाला, पण नोटीस न मिळालेल्या संचालकाने त्यावर स्वाक्षरी करण्यास नकार दिला आणि हा ठराव बेकायदेशीर असल्याबाबत सहाय्यक निबंधकांकडे तक्रार केली.

सहाय्यक निबंधक मिलिंद राऊत यांनी या तक्रारीचा निकाल तक्रारदाराऐवजी सोसायटीच्या बाजूने लावण्यासाठी आणि हे प्रकरण परस्पर मिटवण्याच्या मोबदल्यात त्यांनी सोसायटीच्या सचिवाला सुरुवातीला २५ हजार रुपयांची मागणी केली होती. त्यापैकी १० हजार रुपये राऊत यांनी यापूर्वीच स्वीकारले होते. उर्वरित १५ हजार रुपयांसाठी त्यांचा सतत तगादा सुरू होता, त्यामुळे कंटाळून सचिवांनी ९ जुलै रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहिल्यानगर यांच्याकडे तक्रार नोंदवली.

या तक्रारीची शहानिशा करण्यासाठी १० जुलै रोजी लाच मागणी पडताळणी करण्यात आली. तडजोडीअंती उर्वरित रकमेपैकी १० हजार रुपये स्वीकारण्याचे आरोपी लोकसेवक मिलिंद राऊत यांनी मान्य केले. त्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने तातडीने सापळा रचला. ठरलेल्या नियोजनानुसार, आरोपी राऊत यांनी तक्रारदाराकडून १० हजार रुपयांची लाचेची रक्कम स्वतः स्वीकारली. त्याच वेळी दबा धरून बसलेल्या लाचलुचपतच्या पथकाने त्यांना रंगेहाथ पकडले.

ही कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस उप अधीक्षक अजित त्रिपुटे आणि अंमलदार संतोष शिंदे, वैभव सुपेकर, बाबासाहेब कराड व हारूण शेख यांनी केली. याप्रकरणी आरोपी राऊत विरुद्ध कर्जत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक सविता तांबे करत आहेत.

## बाजार खाली येण्याची वाट... आणि तिची किंमत



राजन कुटे

गुंतवणूक सुरू करण्यापूर्वी अनेक जण अभ्यास करतात, विविध पर्यायांची तुलना करतात, बाजाराच्या हालचालींवर लक्ष ठेवतात आणि मग एक निर्णय घेतात–थोडी बाजारात घसरण होऊ दे, मग सुरुवात करू.

पहिल्या नजरेला हा विचार अगदी रास्त वाटतो. चुकीच्या वेळी गुंतवणूक करण्यापेक्षा योग्य संधीची वाट पाहणं अधिक सुरक्षित वाटतं, पण या प्रतीक्षेची एक किंमत असते आणि ती अनेकदा आपल्या लक्षातही येत नाही.

प्रतीक्षा करताना पैसा सुरक्षित दिसतो, पण तो वाढत नसतो. दिवस जातात, महिने सरतात आणि कधी कधी वर्षेसुद्धा निघून जातात. दरम्यान बाजार वर–खाली होत राहतो, परंतु गुंतवणुकीचा प्रवास मात्र सुरूच होत नाही.

बाजारात घसरण होणार नाही, असं कोणीही म्हणू शकत नाही. उलट, घसरण हा बाजाराचा एक स्वाभाविक घटक आहे. घसरण कधी येईल, किती येईल आणि ती आली तेव्हा आपण खरंच गुंतवणूक करू का–या तीनही प्रश्नांची खात्री कोणालाच देता येत नाही.

वास्तविक, योग्य वेळ साधण्यापेक्षा योग्य सवय लावणं अधिक महत्त्वाचं असतं.

याठिकाणी एक लहानसा फरक समजून घेणं गरजेचं आहे. बाजार घसरला की नियोजनबद्ध पद्धतीने अधिक गुंतवणूक करणं आणि बाजार घसरेपर्यंत गुंतवणूकच सुरू न करणं, या दोन पूर्णपणे वेगळ्या गोष्टी आहेत.

शिस्तबद्ध गुंतवणूकदार बाजारातील चढ–उतारांना आपल्या दीर्घकालीन योजनेचा भाग मानतो. तर संकोच करणारा गुंतवणूकदार योग्य क्षणाच्या शोधातच अनेकदा मौल्यवान वेळ गमावतो.

गुंतवणुकीत प्रत्येक वेळी अचूक वेळ साधणं आवश्यक नसतं, आवश्यक असते ती स्पष्ट उद्दिष्टं, योग्य मालमत्ता वाटप, नियमित गुंतवणूक आणि संयम.

कदाचित म्हणूनच स्वतःला एक साधा प्रश्न विचारायला हवा–मी योग्य वेळेची वाट पाहत आहे, की योग्य निर्णय पुढे ढकलत आहे?

बाजारातील प्रत्येक घसरण ही तात्पुरती असू शकते. पण वेळ निघून गेल्यानंतर गमावलेली वाढ पुन्हा मिळवणं नेहमीच शक्य होत असं नाही.

गुंतवणुकीत सर्वात मोठा धोका प्रत्येक घसरण नसतो; अनेकदा तो सुरुवातच न होण्यात दडलेला असतो. स्पष्ट ठेवा, शांत ठेवा.

– **राजन कुटे**, अँफी नोंदणीकृत म्युच्यूअल फंड वितरक
मो. ९४०३३७४६७४ /९४२३७०८६७०

## 'बुरुडगाव कचरा डेपो आग' प्रकरणी मनपा प्रशासनाने आत्मपरीक्षण करावे

नगर – महानगरपालिकेच्या बुरुडगाव येथील कचरा डेपोला नेहमीच आग लागते. त्यामुळे मोठ्या प्रमाणात वायू प्रदूषण तर होतेच. परंतु आजूबाजूच्या परिसरातील नागरिकांचे आरोग्य देखील धोक्यात येत आहे. काही वर्षांपूर्वी बुरुडगाव येथील स्थानिक गावकरी कचरा डेपोमुळे होणाऱ्या त्रासाविरोधात आंदोलन करायचे. मात्र आता कचरा डेपोमधून महिनाभरापासून धुराचे लोट निघत आहेत. तरी देखील स्थानिक नागरिक गप्प आहेत. गावाबाहेरील पर्यावरण प्रेमी कचरा डेपोच्या आगीची व धुराची दखल घेऊन जिल्हा प्रशासन व महापालिका प्रशासनाकडे तक्रार करत आहेत. मात्र स्थानिक नागरिकांचे मौन आश्चर्यजनक आहे.

कचरा डेपोमध्ये जमा होणाऱ्या कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी महापालिका प्रशासनाकडून कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च केला जातो. तरीदेखील तेथे कचऱ्याला आग लागून मोठ्या प्रमाणात वायू प्रदूषण होते. ही बाब महापालिका प्रशासनाला माहित नाही असे काहीही नाही.

कचरा डेपोतील सर्व घडामोडी मनपा प्रशासनातील सर्व वरिष्ठ अधिकारी, विभाग प्रमुख याचबरोबर पदाधिकारी यांना सर्वांना माहीत आहे. अनेक सामाजिक कार्यकर्ते याबाबत वर्षानुवर्षे तक्रारी करून थकले. परंतु या प्रदूषणात व परिस्थितीत काहीच बदल होत नाही. कचरा प्रक्रियेसाठी येणारा पैसा कागदोपत्री खर्च करून कोट्यावधीचा निधी अक्षरशः गिळला जातो.

भ्रष्टाचार ही न थांबणारी बाब आहे. परंतु कोणत्या बाबतीत आणि किती प्रमाणात भ्रष्टाचार करावा याबाबत महापालिका प्रशासनाने आत्मपरीक्षण करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. शासनाने घनकचरा हाताळणीसाठी कठोर नियम केलेले आहेत. मात्र ते फक्त नागरिकांसाठीच आहेत का? असा प्रश्न या कचरा डेपोतील धुरामधून निर्माण झाला आहे. सर्वसामान्य नागरिकांनी कचऱ्याच्या बाबतीतील नियम मोडले तर त्यांना तात्काळ दंड होतो. इथे मात्र महिनाभरापासून कचऱ्याचे ढीग पेटून वायू प्रदूषण होत आहे. मात्र संबंधित अधिकाऱ्यांवर कोणतीच कारवाई होत नाही. कारण हे सर्व संगनमताने एकमेकांचा बचाव करतात. प्रदूषणासंदर्भातील पर्यावरणप्रेमींच्या तक्रार अर्जांना थेट कचरा डेपो दाखवला जातो.

अशा प्रकारच्या भ्रष्टाचारातून निर्माण झालेल्या वाढत्या प्रदूषणामुळे दिवसेंदिवस ढासळत चाललेला निसर्गाचा असमतोल आपल्या भावी पिढीला नरकात लोटत आहे. याला महापालिका प्रशासनातील अधिकारी व पदाधिकारी हेच जबाबदार आहेत. त्यामुळे भ्रष्टाचारातून निर्माण झालेली कचरा डेपोतील आग व त्यामुळे होणारे वायू प्रदूषण ही बाब गांभीर्याने घेऊन आपण नेमके काय करत आहोत? याचे आत्मपरीक्षण महापालिका प्रशासन, अधिकारी व पदाधिकारी यांनी करावे, असे आवाहन हरिभुमी प्रतिष्ठानचे अध्यक्ष अभय ललवाणी यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

## जिल्हा न्यायालय परिसरातून मोटारसायकल चोरी; गुन्हा दाखल

नगर – शहरातील जिल्हा न्यायालय परिसरातून एच.एफ. डिलक्स मोटारसायकल (क्र. एमएच १६ सीजे ५९८३) अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना ९ जुलै रोजी सकाळी ११ ते दुपारी १२ वाजेच्या दरम्यान घडली.

याबाबत विठ्ठल मारुती शिंदे (वय ३५, रा. पारेवाडी, ता. नगर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे कामासाठी जिल्हा न्यायालय येथे आले होते. त्यांनी आपली मोटारसायकल न्यायालय परिसरात पार्क केली होती. काही वेळातच अज्ञात चोरट्याने ती चोरून नेली. सर्वत्र शोध घेऊनही गाडी न मिळाल्याने विठ्ठल शिंदे यांनी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञात इसमाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## मल्टिस्टेट क्रेडिट सोसायटीकडून ठेवीदाराची सात लाख २७ हजार रुपयांची फसवणूक

### पाईपलाईन रोड शाखेतील प्रकार, चेअरमनसह ७ जणांवर गुन्हा दाखल

नगर – नगर शहरातील पाईपलाईन रोड वर असलेल्या मल्टिस्टेट को–ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या शाखेत ठेवलेल्या ठेवीवर आकर्षक व्याजाचे आमिष दाखवून एका ठेवीदार महिलेची ७ लाख २७ हजार २६० रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात संस्थेच्या चेअरमन आणि कर्मचाऱ्यांसह एकूण ७ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत स्मिता दीपक दिकोंडा (वय ४१, रा. अमृतकलश अपार्टमेंट, द्वारका नगरी, बोरुडे मळा, सावेडी) यांनी १० जुलै रोजी फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांचा राजस्थानी मल्टिस्टेट को–ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड परळी (वैजनाथ) या संस्थेच्या मोरया मंगल कार्यालय, पाईपलाईन रोड येथील शाखेतील पदाधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी विश्वास संपादन केला होता. सोसायटीत ठेव ठेवल्यास त्यावर १२.१२ टक्के दराने व्याज परतावा देण्याचे आमिष त्यांनी फिर्यादीला दाखविले होते. या सर्वांवर विश्वास ठेवून फिर्यादी यांनी जून २०२३ मध्ये संस्थेत ६ लाख रुपये ठेव ठेवली.

मुदत संपल्यानंतरही फिर्यादीला त्यांची हक्काची रक्कम म्हणजे ६ लाख रुपये मुद्दल व त्यावरील १ लाख २७ हजार २६० रुपये व्याज अशी एकूण ७ लाख २७ हजार २६० रुपये एवढी रक्कम परत करण्यात आली नाही. जेव्हा त्यांनी पैशांची मागणी केली, तेव्हा आरोपींनी तुम्ही जर परत येथे दिसलास तर जिवंत सोडणार नाही, अशी जीवे मारण्याची धमकी दिली. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर स्मिता दिकोंडा यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात रीतसर तक्रार दाखल केली.

या तक्रारीवरून पोलिसांनी सोसायटीचे चेअरमन चंदुलाल बिहाणी (रा. परळी शहर, जि. बीड), त्यांची मुलगी पुजा बिहाणी, कर्मचारी वैभव नावडकर (रा. भिस्तबाग चौक), अर्जुन वाव्हळे (रा. पाईपलाईन रोड), कॅशियर रुक्मीणी राजेंद्र साळुंके (रा. तपोवन रोड), मिथुन गांधी (रा. बोरुडे मळा, अहिल्यानगर) व एक लेखनिक अशा ७ जणांविरोधात बीएनएस कलम ३१६(५), ३१६(२), ३५२, ३५१(२), ३(५) आणि महाराष्ट्र ठेवीदारांच्या वित्तीय संस्थांमधील हितसंबंधांचे संरक्षण अधिनियम १९९९ चे कलम ३ प्रमाणे विश्वासघात, फसवणूक आणि धमकी दिल्याचा गुन्हा दाखल केला आहे. तोफखाना पोलीस ठाण्याचे पो. नि. बालाजी वैद्य यांच्या मार्गदर्शनाखाली स.पो.नि. कल्पना चव्हाण या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

## बीएलओ म्हणून कार्यरत असलेले महापालिका कर्मचारी राजेंद्र फुलारी यांची राहत्या घरी गळफास घेत आत्महत्या



नगर – अहिल्यानगर महापालिकेच्या आरोग्य विभागातील कर्मचारी राजेंद्र बबन फुलारी (वय ३५) यांनी आपल्या राहत्या घरात गळफास घेत आत्महत्या केल्याची घटना १० जुलै रोजी दुपारी १ वाजण्याच्या सुमारास उघडकीस आली आहे. सावेडी उपनगरातील पाईपलाईन रोड वरील नामदेव चौक परिसरात असलेल्या घरात त्यांनी ही आत्महत्या केली आहे.

फुलारी यांनी गळफास घेतल्याचे निदर्शनास येताच त्यांना त्यांच्या पत्नी कोमल फुलारी व परिसरातील नागरिकांनी उपचारासाठी तातडीने जिल्हा शासकीय रुग्णालयात नेले. मात्र तेथील वैद्यकीय अधिकारी डॉ. काळे यांनी त्यांना उपचारापूर्वीच मयत घोषित केले. याबाबत तोफखाना पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. फुलारी यांनी आत्महत्या का केली? याचे कारण समजू शकले नाही. याबाबत अधिक तपास पोलीस करत आहेत. फुलारी यांच्या आत्महत्येमुळे महापालिका कर्मचारी वर्गात हळहळ व्यक्त होत आहे.

मयत राजेंद्र फुलारी यांची मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) म्हणून नियुक्ती करण्यात आलेली होती. त्यांनी १६ एप्रिल ते ११ मे २०२६ या काळात अहिल्यानगर शहर विधानसभा मतदारसंघांतर्गत मतदार यादी अद्ययावत करणे आणि मतदार मॅपिंगचे कामात हलगर्जीपणा केल्याचा ठपका ठेवत फुलारी यांच्या विरोधात १७ मे रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सहायक मतदार नोंदणी अधिकारी स्वप्निल ढवळे यांच्या लेखी आदेशानुसार निवडणूक शाखेत कार्यरत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी पर्यवेक्षक सुनील बाजीराव नेटके यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात ही फिर्याद दिली होती. त्यानुसार भारतीय न्याय संहिता कलम २२३ आणि लोकप्रतिनिधीत्व कायदा कलम ३२ नुसार हा गुन्हा नोंदविण्यात आला होता. यामुळे आलेले नैराश्य आणि अतिरिक्त कामाचा ताण, त्यातच प्रशासकीय कारवाईचा धसका या तणावातून त्यांनी आत्महत्यासारखे टोकाचे पाऊल उचलले असावे, अशी महापालिका वर्तुळात चर्चा असून सोशल मिडीयावरही अनेक जण याबाबत संताप व्यक्त करत आहेत.

## नगरमध्ये जुन्या महापालिकेजवळ तरुणाकडून गांजाचा साठा जप्त

नगर – जुनी महापालिका परिसरात गांजा हा अंमली पदार्थ बाळगणाऱ्याला कोतवाली पोलिसांनी पकडले. त्याच्याकडून ६० हजारांचा गांजा जप्त करण्यात आला. ही कारवाई १० जुलै रोजी रात्री सव्वा नऊ वाजेच्या सुमारास करण्यात आली. विशाल भिकाजी पारखे (वय २४, रा. भगवानबाबा मंदिराजवळ, सारसनगर, अहिल्यानगर) असे गुन्हा दाखल झालेल्या आरोपीचे नाव आहे.

जुन्या महानगरपालिकेजवळ एक तरुण संशयास्पद रित्या वावरत असल्याची माहिती कोतवाली पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पो.नि. नितीन देशमुख यांनी गुन्हे शोध पथकातील महिला पोलीस अंमलदार रोहिणी दरंदले, पल्लवी रोहकले तसेच रमेश शिंदे, दीपक रोहकले यांच्या पथकाला कारवाईसाठी पाठविले. या पथकाने संशयित विशाल पारखे यास ताब्यात घेत त्याची झडती घेतली असता त्याच्या कडे असलेल्या एका पांढऱ्या रंगाच्या गोणीमध्ये हिरवट रंगाचा, पाने–फुले असलेला आणि उग्र वास येणारा गांजा आढळून आला. पोलिसांनी गोणीसह एकूण ६० हजार रुपये किमतीचा गांजा हा अंमली पदार्थ जप्त केला आहे. यानंतर महिला पोलीस हवालदार रोहिणी दरंदले यांच्या फिर्यादीवरून कोतवाली पोलीस ठाण्यात आरोपी विशाल पारखे याच्याविरुद्ध एनडीपीएस ॲक्ट १९८५ चे कलम ८ (क) आणि २०(ब) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कोतवाली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली स.पो.नि. चिटणीस हे या गुन्ह्याचा पुढील तपास करत आहेत.


## नगर–दौंड महामार्गावर २ ट्रकची समोरासमोर धडक

(पान १ वरुन)

### अपघातग्रस्तांना मदत करणारे थोडक्यात बचावले

अपघाताचा आवाज येताच संदेश कार्ले, त्यांचे बंधू प्रवीण कार्ले, मुलगा तसेच क्रशरवरील कामगार तातडीने मदतीसाठी धावले. गंभीर जखमी झालेल्या ट्रक चालकाला त्या सर्वांनी केबिनमधून बाहेर काढले. ते ट्रक पासून थोड्या अंतरावर गेले असता अचानक एका ट्रकच्या इंधनाच्या टाकीचा मोठा स्फोट झाला आणि दोन्ही वाहनांना भीषण आग लागली. आम्ही मदतीसाठी धावलो, मात्र काळ आमच्यावरच आला होता, पण वेळ आली नव्हती त्यामुळे मी आणि आमचे कुटुंब थोडक्यात वाचले अशी प्रतिक्रिया संदेश कार्ले यांनी व्यक्त केली. हा नगर दौंड महामार्ग मृत्यूचा सापळा बनलेला आहे. आज पर्यंत मी व माझ्या कुटुंबीयांनी आणि कामगारांनी सुमारे २०० पेक्षा जास्त अपघात ग्रस्तांना रात्री – अपरात्री खंडाळा, खडकी, बाबुर्डी, हिवरे झरे या परिसरात मदत केली आहे. त्या पुण्याईमुळे आम्ही आज बचावलो असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. तसेच या वाढत्या अपघातांना आळा घालण्यासाठी प्रशासकीय स्तरावर तातडीने उपाययोजना होण्याची आवश्यकता असल्याचेही ते म्हणाले.

## भाऊसाहेब वाघुले यांचे दीर्घ आजाराने निधन



नगर – नागरदेवळे येथील भाऊसाहेब देवराम वाघुले (वय ६५) यांचे ५ जुलै रोजी दीर्घ आजाराने निधन झाले.

त्यांच्या पश्चात पत्नी, ४ मुली, एक मुलगा, भाऊ, पुतणे, नातवंडे असा परिवार आहे. भोसले आखाडा येथील राजू वाघुले यांचे ते थोरले भाऊ होत.


## लिलाबाई भंडारी यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर – प्रेमदान हडको येथील रहिवासी लिलाबाई धनराज भंडारी (वय ९०) यांचे ११ जुलै रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे १ मुलगा, सुन, २ नातवंडे असा परिवार आहे. संजय भंडारी यांच्या त्या मातोश्री होत.

## नेमीचंद चुडीवाल यांचे दु:खद निधन



नगर – स्टेशन रोड येथील हॉटेल यश ग्रॅण्ड समोरील रहिवासी, दिगंबर जैन समाजातील ज्येष्ठ सदस्य नेमीचंद चुन्नीलाल चुडीवाल (वय ८७) यांचे १० जुलै रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, मुलगी सूरज व जावई महावीर थोलिया (वैजापूर), ३ भाऊ, ३ बहिणी, नातवंडे असा परिवार आहे. भागचंद, सुभाष व अशोक चुडीवाल यांचे ते मोठे बंधू होत.

## मनोरमाबाई शिंगवी यांचे दु:खद निधन



पुणे – घोरपडी गाव, देवळाली पुणे येथील रहिवासी मनोरमाबाई शिंगवी (वय ८३) यांचे १० जुलै रोजी संथाराव्रतात निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर पुणे येथील धोबीघाट स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्यामागे पती, १ मुलगा, १ मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. पन्नालाल शिंगवी यांच्या त्या पत्नी होत.

## बायपास टोलनाक्याजवळ भीषण अपघात; ट्रेलर चालकाचा मृत्यू

नगर – केडगाव बायपास टोलनाक्याजवळ रस्त्यावर अचानक थांबलेल्या ट्रकला पाठीमागून वेगात आलेल्या ट्रेलरची जोराची धडक बसून झालेल्या अपघातात ट्रेलर चालकाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना ७ जुलै रोजी मध्यरात्री १.१५ वाजेच्या सुमारास घडली. मारुती माधवराव बंडे (वय ४१, रा. जेजुरी, ता. पुरंदर, जि. पुणे) असे मयताचे नाव आहे. अपघातानंतर अज्ञात ट्रक चालक घटनास्थळावरून पळून गेला आहे.

याबाबत बारामती येथील ट्रान्सपोर्ट व्यावसायिक उमेश शंकर भोंडवे (वय ४७) यांनी १० जुलै रोजी नगर तालुका पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. मयत मारुती बंडे हे त्यांच्या ताब्यातील ट्रेलर (क्र. एमएच ४० बीजी ५०८९) घेऊन जात होते. केडगाव बायपास टोलनाक्याजवळ येथे पोहोचले असता, पुढील अज्ञात ट्रकवरील चालकाने त्याचे ताब्यातील वाहन हलगर्जीपणाने अचानक रोडवर उभे केले. यामुळे पाठीमागून येणाऱ्या मारुती बंडे यांच्या ट्रेलरची ट्रकला जोराची धडक बसली. या भीषण अपघातात मारुती बंडे यांचा मृत्यू झाला, तसेच ट्रेलरचेही मोठे नुकसान झाले. अपघातानंतर अज्ञात ट्रक चालकाने घटनास्थळावरून पळ काढला. या प्रकरणी नगर तालुका पोलिसांनी अज्ञात ट्रक चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## महाराष्ट्र पान व्यापारी महासंघाचा १४ जुलै रोजी मुंबई येथे 'मोर्चा'

### 'चलो आझाद मैदान, चलो मुंबई'चे आवाहन कायम राज्यभरातील पान दुकानदारांना सहभागी होण्याचे फैय्याज तांबोळी आवाहन




नगर – महाराष्ट्र पान व्यापारी महासंघाच्या वतीने मुंबई येथील आझाद मैदानावर ७ जुलै रोजी आयोजित करण्यात आलेला धडक मोर्चा मुंबईतील मुसळधार पाऊस व प्रतिकूल हवामानामुळे पुढे ढकलण्यात आला असून आता हा मोर्चा १४ जुलै रोजी सकाळी १० वाजता आझाद मैदान, मुंबई येथे होणार आहे. याबाबत महासंघाने नव्याने पत्रक प्रसिद्ध करून राज्यातील सर्व पान शॉप व्यावसायिकांना मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

महासंघाच्या म्हणण्यानुसार, अन्न व औषध प्रशासन तसेच इतर यंत्रणांकडून पान दुकानदारांवर होत असलेल्या कारवायांविरोधात हा मोर्चा काढण्यात येत आहे. राज्यभरातील पान शॉप व्यावसायिकांनी १४ जुलै रोजी आपला व्यवसाय बंद ठेवून मुंबईतील आझाद मैदानावर एकत्र यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

अन्न व औषध प्रशासनाकडून करण्यात येणाऱ्या अन्यायकारक कारवाया तात्काळ थांबवाव्यात तसेच सुगंधी तंबाखूवरील बंदीबाबत योग्य निर्णय घेण्यात यावा.

पानपट्टी चालकांवर होणाऱ्या बेकायदेशीर कारवाया थांबवाव्यात. पोलिसांकडून होणारा चुकीच्या अर्थाने कायद्याचा वापर रोखावा. पान शॉप व्यावसायिकांना अनुदान व विनातारण कर्ज उपलब्ध करून द्यावे. प्रत्येक पान दुकानदाराच्या कुटुंबातील एका सदस्याला शासकीय अथवा निमशासकीय सेवेत संधी द्यावी. पान व्यवसायाच्या आर्थिक विकासासाठी स्वतंत्र महामंडळाची स्थापना करावी.

या राज्यव्यापी आंदोलनाचे नेतृत्व प्रदेशाध्यक्ष अजित सूर्यवंशी, कार्याध्यक्ष शरद मोरे, तांत्रिक सल्लागार हेमंग शहा, अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष फैय्याज तांबोळी, लातूर जिल्हाध्यक्ष मसूद काझी, सांगली जिल्हाध्यक्ष रत्नाकर नांगरे यांच्यासह राज्यातील सर्व जिल्हाध्यक्ष करीत असून, पान शॉप व्यावसायिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन आंदोलन यशस्वी करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## केडगावमधून दोन टेम्पोच्या बॅटऱ्यांची चोरी; गुन्हा दाखल

नगर – केडगाव परिसरातील भूषणनगर येथे उभ्या असलेल्या दोन टेम्पोच्या बॅटऱ्या अज्ञात चोरट्याने लंपास केल्याची घटना ७ जुलै रोजी पहाटे २ वाजेपासून ते १० जुलै रोजी सकाळी ११.३० वाजेच्या दरम्यान घडली. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात अज्ञात चोराविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत यश प्रभाकर भांबरकर (वय २६, रा. राणी लक्ष्मीबाई चौक, भूषणनगर, केडगाव) यांनी फिर्याद दिली आहे. भांबरकर यांनी त्यांचे टेम्पो (क्र. एमएच १६ सीसी २४८३ आणि एमएच १६ सीडी ७३९२) हे नेहमीप्रमाणे घराच्या परिसरात उभे केले होते. या दरम्यान अज्ञात चोरट्याने दोन्ही टेम्पोच्या एकूण १४ हजार रुपये किमतीच्या बॅटऱ्या चोरून नेल्या. बॅटऱ्या चोरीला गेल्याचे लक्षात आल्यानंतर यश भांबरकर यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात तक्रार दिली. या तक्रारीवरून पोलिसांनी १० जुलै रोजी अज्ञात चोरट्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) प्रमाणे चोरीचा गुन्हा नोंदवला आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### राखा पोटाचे आरोग्य

आतड्यांचे आरोग्य आपल्या शरीराचा 'दुसरा मेंदू' म्हणून काम करते, कारण आपल्या पोटाचा थेट संबंध मूड आणि मानसिक आरोग्याशी असतो. आजच्या पॅकेटबंद आणि प्रक्रिया केलेल्या अन्नामुळे पोटातील चांगले जीवाणू कमी होतात, ज्यामुळे पचनक्रिया बिघडते आणि आजार वाढतात. हे टाळण्यासाठी आहारात फायबरयुक्त अन्न, हिरव्या भाज्या, मोड आलेली कडधान्ये आणि ताजी फळे समाविष्ट करणे अत्यंत आवश्यक आहे. तसेच दही, ताक यांसारखे प्रोबायोटिक्स पदार्थ खाल्ल्याने आतड्यांमधील चांगल्या जीवाणूंची संख्या वाढते आणि पचन सुलभ होते. रोज पुरेसे पाणी पिणे, जेवण शांतपणे चावून खाणे आणि रात्रीचे जेवण हलके ठेवल्याने सिडिटी व गॅसचा त्रास दूर होतो. पोटाचे आरोग्य चांगले असेल तर शरीराची रोगप्रतिकारशक्ती मजबूत राहते आणि त्वचाही नैसर्गिकरित्या चमकदार बनते. म्हणूनच निरोगी शरीरासाठी आपल्या पोटाची काळजी घेणे हाच आरोग्याचा खरा मूलमंत्र आहे.

## पाककला

### मिक्स व्हेज ब्रेड रोल

**साहित्य :** ब्रेड स्लाईस ४, बटाटा १ मध्यम उकडलेला, उकडलेला गाजर १/२ किसलेला, किसलेली शिमला मिरची १/२, बारीक चिरलेला कांदा १ लहान, बारीक चिरलेला टोमॅटो १, चीज स्लाईस २, बटर २ चमचे, हिरवी चटणी २ चमचे, टोमॅटो केचप २ चमचे, चाट मसाला १ चमचा, जिरे पावडर १/२ चमचा, काळी मिरी पावडर १/२ चमचा, लाल तिखट १/२ चमचा, मीठ १/४ चमचा, चवीनुसार बारीक चिरलेली कोथिंबीर १ चमचा

**कृती :** उकडलेला बटाटा कुस्करून घ्या. त्यात किसलेले गाजर, चिरलेली शिमला मिरची, कांदा, टोमॅटो घाला. त्यात चाट मसाला, जिरे पावडर, काळी मिरी पावडर, लाल तिखट, मीठ आणि कोथिंबीर घालून मिश्रण एकजीव करा. तखटपणा जास्त हवा असेल तर हिरवी चटणी १ चमचा जास्त घाला. ब्रेडच्या कडा कापून टाका. ब्रेड स्लाईस थोडा पाण्यात बुडवून लगेच बाहेर काढा आणि हलक्या हाताने पिळून घ्या. ओल्या ब्रेडच्या मधोमध तयार भाजीचे मिश्रण ठेवा. त्यावर चीज स्लाईसचा छोटा तुकडा ठेवा. ब्रेडच्या बाजू दुमडून रोलचा आकार द्या. सर्व रोल असे तयार करा. तवा गरम करून त्यावर बटर सोडा. तयार रोल ठेवून मध्यम आचेवर सर्व बाजूंनी खरपूस आणि सोनेरी रंग येईपर्यंत शॅलो फ्राय करा. गरमागरम ब्रेड रोल टोमॅटो केचप आणि उरलेल्या हिरव्या चटणीसोबत खायला द्या.

## वास्तू

### बाल्कनी व खिडक्या

घराच्या उत्तर आणि पूर्व दिशेला जास्त खिडक्या व बाल्कनी असाव्यात. यातून सकाळची सूर्याची सकारात्मक ऊर्जा घरात येते.

* पश्चिम व दक्षिण दिशेला कमी आणि लहान खिडक्या असाव्यात. खिडक्या नेहमी स्वच्छ ठेवाव्यात.

* बैठकीची खोली हलक्या निळ्या, हिरव्या किंवा क्रीम रंगाची असावी. बेडरूम साठी गुलाबी, फिकट जांभळा रंग चांगला. स्वयंपाक घरात नारंगी किंवा पिवळा रंग वापरावा. काळा, गडद निळा, गडद लाल रंग भिंतीसाठी टाळावा.

* घराच्या ईशान्य किंवा उत्तर दिशेला तुलसीचे रोप लावावे. तुलसीमुळे घरातील वातावरण शुद्ध राहते.

## सौंदर्य

मानेपासून खालीपण फेस सारखीच काळजी घ्या. शॉवर नंतर ओल्या अंगावरच बॉडी लोशन लावा. आठवड्यातून १ वेळा क बॉडी लोशन वापरल्यास पाठीवरचे डाग, काळे कोपर जाऊन एकसारखा टोन येतो.

## सल्ला

* धने ४ चमचे, जिरे २ चमचे, बडीशेप १ चमचा, काळी मिरी १ चमचा, दालचिनी १ तुकडा भाजून पूड करा. हा 'ऑल इन वन गरम मसाला' भाजी, आमटी, पुलाव कशातही चमचाभर टाकला की झटपट चव येते.

* छोले रात्रभर न भिजवता १ तास गरम पाण्यात चिमूटभर सोडा टाकून भिजवा. मग कढईत झाकण ठेवून २० मिनिटे शिजवा. कुकर इतकेच मऊ होतात.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

रविवार, दि. १२ जुलै २०२६

**प्रदोष, शिवरात्रि, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, निज ज्येष्ठ कृष्णपक्ष, रोहिणी ०८|२९, मृग २९|४२, सूर्योदय ०६ वा. ३२ मि. सूर्यास्त ०५ वा. ३० मि.**

### राशिभविष्य

**मेष :** नवीन काम सुरू होईल. उत्साह वाढेल. प्रवासाचे योग जुळून येतील.

**वृषभ :** पैशाची आवक होईल. थकवा जाणवेल. जुने मित्र भेटतील.

**मिथुन :** मान–सन्मान मिळेल. नवीन ओळख होईल. महत्वाची बातमी मिळेल.

**कर्क :** मन अस्थिर राहील. खर्च वाढेल.घरात बदलाचे संकेत आहेत.

**सिंह :** आत्मविश्वास वाढेल. काम पूर्ण होईल. मुलांकडून आनंद मिळेल.

**कन्या :** मेहनत वाढेल. कष्टाचे फळ मिळेल. नोकरीत बदल घडेल.

**तूळ :** कलागुणांना वाव मिळेल. आनंदी दिवस. प्रेमसंबंधात जवळीक वाढेल.

**वृश्चिक :** रागावर ताबा ठेवावा लागेल. घरात तणाव. जमिनीचे काम मार्गी लागेल.

**धनु :** धाडस वाढेल. इच्छा पूर्ण होईल. भावंडांची भेट होईल.

**मकर :** बोलण्याने कामे होतील. पैसा मिळेल. कुटुंबात शुभ घटना घडेल.

**कुंभ :** नवे विचार सुचतील. निर्णय घ्याल. लोक तुमच्याकडे आकर्षित होतील.

**मीन :** खर्च वाढेल. चिंता राहील. बाहेरगावी जावे लागेल.

## शब्दगंध क्र. ७४७१ सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | | ४ | ■ | ५ |
| ६ | | ■ | | ■ | ७ | ८ | |
| ९ | | १० | | ११ | ■ | १२ | |
| ■ | ■ | १३ | | | ■ | १४ | |
| १५ | १६ | | ■ | ■ | १७ | ■ | ■ |
| १८ | | | १९ | ■ | २० | २१ | |
| | ■ | २२ | | | | | ■ |
| २३ | | | | ■ | २४ | | |

**आडवे शब्द :-** १) उत्खननात सापडलेल्या पाच हजार वर्षांपूर्वीच्या दोन शहरांपैकी एक ६) हलक्या प्रतीचे; कमी दर्जाचे ७) काव्याचा एक प्रकार (विशेषत: उर्दू) ९) दुसऱ्याच्या मनातले ओळखणारा १२) आईचा भाऊ; मातुल १३) एक पक्षी १४) महिला; स्त्री; बाई १५) अरबस्तानचा रहिवासी १८) मुख्य सोडून इतर गौण धान्ये २०) कापड; वस्त्र; वसन २२) गोमंतकातील एक प्रसिद्ध देवता ३) रम्य; मनोहारी २४) ग्लानी; शीण; मरगळ

### शब्दगंध क्र. ७४७० चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| स | दा | ह | रि | त | ■ | म | ध |
| मा | स | ■ | का | र | खा | नी | स |
| न | ■ | ■ | म | स | ण | ■ | मु |
| ■ | आ | म | टे | ■ | ■ | आ | स |
| सं | ग | ण | क | ■ | का | व | ळा |
| घ | र | ■ | डा | स | ■ | श्य | ■ |
| ट | ■ | को | ■ | ध्या | ■ | क | सा |
| ना | रा | य | ण | ■ | क | ता | र |

**उभे शब्द :-** १) अभियान २) हत्या; नुकसान; वध; हिंसा ३) सशक्त; जबरदस्त; जुलमी ४) शरीर प्रकृतीत निर्माण होणारी विकृती ५) कपाट ८) युग; हंगाम १०) अतिशय निर्दयी कृत्य ११) मलेरिया पसरविणारा एक कीटक; मच्छर १५) देवादिकांचे अन्य रूपाने पृथ्वीवर येणे १६) रड; रडगाणे १७) भारुडासाठी प्रसिद्ध पावलेले पैठणचे संत १९) अभ्यास; सराव २१) टीम; चमू; टोळी

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार :** ध्येय दूर आहे म्हणून रस्ता सोडू नका, कारण चालत राहिल्यानेच अंतर कमी होते.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### जुळ्या मुलांचे गुपित : निसर्गाचा हा अद्भूत चमत्कार विज्ञानालाही कोड्यात टाकतो का?


निसर्गाच्या अनंत चमत्कारांपैकी एक सर्वात सुंदर आणि अद्भूत चमत्कार म्हणजे जुळी मुले, ज्यांचे जग विज्ञानालाही थक्क करणारे आहे. एकाच वेळी एकाच आईच्या गर्भात दोन जीवांचे एकत्र वाढणे हे केवळ कौतुकास्पद नसून मानवी शरीराच्या अफाट क्षमतेचे दर्शन घडवणारे आहे. या नात्याची खरी सुरुवात जन्माच्या नऊ महिने आधीच आईच्या गर्भाशयात झालेली असते, जिथे अवघ्या चौदाव्या आठवड्यापासून ही मुले एकमेकांशी संवाद साधू लागतात. ती स्वतःला स्पर्श करण्यापेक्षा जास्त आपल्या जुळ्या भावंडाला हळुवारपणे स्पर्श करतात, एकमेकांचे हात धरतात आणि जणू जन्मापूर्वीच एक घट्ट मैत्रीचा बंध विणतात. जन्मानंतरही त्यांच्यात एक अजब मानसिक कनेक्शन पाहायला मिळते, ज्याला अनेकदा लोक टेलिपॅथी म्हणतात, कारण दूर असूनही एकमेकांच्या सुखाची वा दुःखाची जाणीव त्यांना सहज होते. हुबेहूब एकसारख्या दिसणाऱ्या जुळ्या मुलांमध्ये विज्ञानाला एक 'मिरर इमेज' नावाचा अद्भूत प्रकार आढळतो, ज्यामध्ये ही मुले एकमेकांची आरशातील प्रतिमा वाटतात. जर एका जुळ्या भावंडाच्या डाव्या गालावर खळी पडत असेल तर दुसऱ्याच्या उजव्या गालावर पडते आणि एकाचा केसांचा भांग डावीकडे असल्यास दुसऱ्याचा उजवीकडे असतो. इतकेच नाही तर हुबेहूब दिसणाऱ्या जुळ्या मुलांचा डीएनए जरी सारखा असला, तरी निसर्गाने प्रत्येकाला वेगळेपण देण्यासाठी त्यांच्या हाताचे ठसे म्हणजेच फिंगरप्रिंट्स पूर्णपणे वेगळे ठेवले आहेत. लहानपणी ही मुले आपापसात बोलण्यासाठी एका अशा गुप्त भाषेचा वापर करतात जी जगातील इतर कोणालाही, अगदी आई–वडिलांनाही समजत नाही आणि विज्ञानात याला 'क्रिप्टोफेसिया' म्हटले जाते. काही वेळा त्यांच्या जन्मातील अवघ्या काही मिनिटांचा फरक एक अजब योगायोग घडवतो, जेव्हा एकाचा जन्म ३१ डिसेंबरच्या रात्री आणि दुसऱ्याचा १ जानेवारीच्या पहाटे होतो, ज्यामुळे त्यांची जन्मतारीख आणि थेट वर्षसुद्धा बदलते. आपल्या भारतातील केरळ राज्यातील 'कोडिन्ही' हे गाव तर या जुळ्या मुलांमुळे जगभरात प्रसिद्ध आहे, जिथे ५०० हून अधिक जुळी जोडपी राहतात आणि यामागचे रहस्य वैज्ञानिक आजही शोधत आहेत. ही मुले जरी एकत्र जन्माला आली असली आणि त्यांच्या आवडीनिवडी सारख्या असल्या, तरी निसर्गाने प्रत्येकाला स्वतःचे एक स्वतंत्र आणि सुंदर व्यक्तिमत्त्व दिलेले असते.

### सोन्याचा गर्व

एका राजाच्या मुकुटातील सोन्याला स्वतःच्या मोठ्या आकाराचा आणि सौंदर्याचा खूप गर्व होता. तो मुकुटात बसवलेल्या एका लहान हिऱ्याला नेहमी हिणवायचा आणि स्वतःला श्रेष्ठ समजायचा. हिरा मात्र शांत आणि नम्र राहायचा. एकदा युद्धादरम्यान मुकुटावर तलवारीचा वार झाला, ज्यामुळे सोने वाकले आणि त्याची चकाकी कमी झाली. जेव्हा सोनाराने मुकुट दुरुस्त करायला घेतला, तेव्हा तो म्हणाला, सोन्यावर ओरखडे आले तरी चालतील, पण मुकुटाची खरी किंमत या मौल्यवान आणि कठीण हिऱ्यामुळे आहे, ज्याला साधा ओरखडाही लागला नाही. हे ऐकून सोन्याचा गर्व गळून पडला आणि त्याला हिऱ्याच्या नम्रतेचे महत्त्व समजले.

बोध : खरे श्रेष्ठत्व माणसाच्या गुणांमध्ये आणि नम्रतेत असते. गर्वामुळे माणसाची किंमत कमी होत.

## आत्मशक्ति



### आनंदाने परिपूर्ण

आनंदाने परिपूर्ण होतो. ज ह्या जगातील प्रेमापेक्षा दुसरे महान असे प्रेम आहे का ?

प्रेमाने पुरेपूर भरलेले संबंध म्हणून आत्मीय प्रेमाकडे पहाता येईल. मायलेकांतील प्रेम हे ह्या जगातील सर्वोत्तम प्रेम समजले जाते. आई–वडिलांच्या प्रेमाची गोडी घेण्याचे भाग्य आम्हाला लाभले, तर आम्हाला कळून येईल की ते आमची कितीतरी काळजी घेतात.आमचे जेवण, कपडे, निवास, औषधे, शिक्षण आणि क्रीडा (खेळणे) ह्यासाठी त्यांनी खूप कष्ट घेतले आहेत; आमचा सांभाळ करण्यात त्यांनी पुष्कळ वेळ घालविला आहे; आम्ही शाळेत एखाद्या संघाकडून खेळत असतांना त्यांनी पाहिले असेल तेव्हा कौतुक केले असेल किंवा नाटकांत भाग घेऊन अभिनय केला, तो त्यांनी पाहिला असेल तेव्हा प्रोत्साहन दिले असेल! जरी आईबरोबर आमचे संबंध ठीक नसतील तरीही लक्षात घ्यावे की, तिने आमचा भार नऊ महिने उदरी वाहिला आहे व आम्ही ह्या जगात येतांना तिने असह्य प्रसूती वेदना सहन केल्या आहेत.

तारुण्यात आम्ही यौवनसुलभ प्रेमाचा अनुभव घेतला असेलच! कोणा एखाद्याचे प्रेम वाया घालविलेही असेल! (क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### जबाबदारी

सुरेश ओबेरॉय : आणि मग आपण जेव्हा एखादं चांगलं काम करू तेव्हा जग आपली प्रशंसा करणार नाही. शिवानीदीदी : हे दुय्यम आहे. जग आपल्याला काय देतं हा आपला फोकस नाहीये. आपण इतरांना काय देऊ शकतो यावर आपला फोकस आहे. इतरांची प्रशंसा करणं आणि त्यांना प्रेरणा देणं खूप सुंदर आहे आणि सोपं.

सुरेश ओबेरॉय जेव्हा आपण मुक्तपणे देतो तेव्हा आपण आतून खुलतो. शिवानीदीदी हो, हाच देण्याचा फायदा आहे. इतरांना दिल्याने आपण आपल्या ऊर्जेला प्रवाही करतो. नाहीतर ही ऊर्जा रोखली गेली असती आणि आपण खूपच औपचारिक झालो असतो. म्हणून नेहमी देत राहा.

अजून एक सोपा प्रकार म्हणजे इतरांना जबाबदारी देणं. आपल्या जबाबदाऱ्या दुसऱ्यांवर सोपवताना आपल्याला खूप असुरक्षित वाटतं. भलेही आपण एका कुटुंबाचे किंवा संस्थेचे प्रमुख असलो तरीही, आपल्याला सत्ता आपल्याकडेच ठेवायची असते. इतरांना जबाबदाऱ्या द्या आणि त्यांना त्यांच्या मनाप्रमाणे गोष्टी करण्याचं स्वातंत्र्य द्या. हे करताना आपण त्यांना सशक्त बनवतो. आपलं काम करताना त्यांच्याकडून एखादी चूक घडू शकते ही शक्यता स्वीकारा..

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

ग्राहक : वेटर, या भाजीमध्ये चिकनचा एकही पीस नाहीये!

वेटर : सर, मग 'गुलाबजाम' मध्ये काय तुम्हाला गुलाब मिळतो का?

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* भारताच्या राष्ट्रपतींना पद आणि गोपनीयतेची शपथ कोण देतात?

– भारताचे सरन्यायाधीश

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## साहित्य सहवास – 'स्वतःच्या पायांवर उभं राहा...'

कापडबाजारात, मागच्या आठवड्यात गेलो होतो. नवे कपडे खरेदी केले. बायकोसाठी गजरा घेण्यासाठी गेलो. साधारण पंधरा वर्ष वयाचा एक मुलगा गजरे विकतांना पाहिला. मनापासून वाटलं – ह्याच्याचकडुन गजरा घ्यायचा. मी गजऱ्याची किंमत विचारली. दोन गजरे घेतले. पैसे दिले. 'शाळेत जातोसना ?' मी त्याला विचारल. तो म्हणाला, 'हो. रात्रीच्या शाळेत जातो.' 'तुझे आई, वडिल?' तो रडु लागला. मी मनापासुन, त्याची माफी मागितली. 'मामाकडे राहतोय. आई, वडिल रस्ता अपघातात वारले.' माझं व्हिजीटिंग कार्ड देऊन त्याला म्हणालो, 'जेव्हा माझी गरज असेल तेव्हा फोन कर.' होकारार्थी मान हलवत त्याने शर्टच्या खिशात व्हिजीटिंग कार्ड ठेवलं. 'परिस्थितीने आपल्या पायांवर ऊभं राहायला शिकवलं म्हणून मी परिस्थितीचे आभार मानतो दररोज . ' – त्याचं हे वाक्य मनात घर करुन बसलं. त्याच्याशी हस्तांदोलन करुन निघालो. घरी आलो. गजरे विकणाऱ्या मुलाच्या वयाची मुलं कॉलनीत खेळत होती. ही मुलं सुध्दा स्वतःच्या पायांवर ऊभी राहणारंच आहेत, त्याला काही वर्षे लागणार आहेत. फेसबुकवर एक मेसेज फोटोसह पाहिला. वाचला. एका विद्यार्थ्याच्या वडिलांच्या मृत्यूनंतर एका शिक्षकाने सदर विद्यार्थ्याची शाळेची फी अनेक वर्षे भरली. सदर विद्यार्थी स्वतःच्या पायांवर ऊभा राहिल्यावर त्याने सदर गुरुंना नवीन कार घेऊन दिली. ही कृतज्ञता खरच प्रेरणादायी आहे. असे गुरु लाभायलाही भाग्य लागतं. सदर विद्यार्थ्याच्या भूमिकेत जाऊन विचार केल्यावर लक्षात येत गुरुनी केलेले सत्कार्य निश्चितच आपल्यासाठी प्रेरणादायी, अनुकरणीय आहे. ह्या दोन्हीही घटना वाचल्यानंतर 'साहित्य सहवास' चे वाचक नक्कीच मनापासून विचार करतील. मी स्वतः सुध्दा विचार केला की मी किती जणांना, त्यांच्या पायांवर उभं राहण्यासाठी सहकार्य केलं आहे? शाळा, महाविद्यालये, गणेशोत्सव, नवरात्रोत्सवात महिला मंडळांमध्ये माझे 'सुयशमार्ग' हे प्रेरणादायी संवाद व्याख्यान कार्यक्रम झाले. त्या – त्यावेळी (गेली १० वर्षे) मुला, मुलींना सांगितलं की भरपूर शिक्षण घ्या, एखाद–दुसरी कला शिका, आत्मसात करा. स्वतःच्या पायांवर ऊभे राहा. आई, वडिलांना आधार द्या. काही मुलं, मुली आज स्वतःच्या पायांवर ऊभी आहेत. आई, वडिलांना आधार देताहेत शिवाय बचत करताहेत, सामाजिक उपक्रमांमध्ये सहभागी होताहेत. ह्या साहित्य सहवासाच्या निमित्ताने मुलींना मी नम्र विनंती करतो की तुम्ही स्वतःच्या पायांवर ऊभ्या राहाच. मुलींनी स्वतःच्या पायांवर ऊभं राहाणं ही आजच्या काळाची गरज आहे. भविष्यकाळ हा कसा असेल हे कुणीही ठामपणे सांगु शकणार नाही. पण आज स्वतःच्या पायांवर मुली ऊभ्या राहिल्या तर भविष्यकाळ नक्कीच चांगला असेल. महत्वाचं म्हणजे स्वतःच्या पायांवर ऊभं राहण्यासाठी आधी शिक्षण पूर्ण करा. संबंधित कोर्सेस पूर्ण करा. अवांतर वाचनासाठी वेळ द्या. जे ध्येय आहे त्या ध्येयाशी प्रामाणिक राहुन त्याविषयी अधिकाधिक ज्ञान, माहिती मिळवा. माझी शारिरिक, मानसिक, आर्थिक परिस्थिती कशी आहे ? ह्याचा विचार करणंही महत्वाचं आहे. असं पाहण्यात आलं आहे की शारिरिक, मानसिक आणि आर्थिक परिस्थिती प्रतिकुल असतांनाही काही मुला, मुलींनी घरच्यांच्या भक्कम पाठिंब्यामुळे, प्रतिकुल परिस्थितीचा खंबीरपणे सामना केला. अथक परिश्रम केले, स्वतःला चांगल्या अर्थाने बदलवलं. स्वतःच्या पायांवर उभं राहण्यासाठी अशक्य असं काहीच नसतं. आपली प्रबळ इच्छाशक्ती बरंच काही करु शकते. पण जे परिस्थितीला वाईट समजतात, माझं नशिबच फुटकं आहे असं वारंवार म्हणत रडत बसतात ते स्वतःच्या पायांवर लवकर उभे राहु शकत नाहीत. कमी वयात स्वतःच्या पायांवर उभे राहिलेल्या किती व्यक्तींना मी भेटलो आहे ? नसेल भेटलो तर भेटलंच पाहिजे. त्याचे अनुभव मला सुध्दा उपयोगी पडतील. स्वतःच्या पायांवर उभं राहण्यासाठी अनेकांचं योगदान असतं ह्याचा विचार कधी केला आहे का? नसेल केला तर असा विचार नक्कीच करा. आपल्या हाताचं बोट धरून आपल्याला चालायला शिकवणारे आई, वडिल ह्यांच्यापासून स्वतः च्या पायांवर उभं राहण्यासाठीचा प्रवास सुरु होतो. मी, स्वतःच्या पायांवर ऊभं राहिलो म्हणजे सगळं काही मिळालं का? माझे लहान भाऊ, बहिण, मित्र, परिचित ह्यांना त्यांच्या पायांवर ऊभं राहण्यासाठी सहकार्य करणं हे महत्वाचं आणि गरजेचं आहे. मी माझ्या स्वतः च्या पायांवर ऊभं असतांना फक्त माझ्याच पायांभोवती पाहात राहिलो तर मी निसर्ग, व्यक्ती पाहुच शकणार नाही. मी स्वतःच्या पायांवर ऊभं असतांना इतरांसाठी काय – काय करु शकतो ? ह्या प्रश्नाचं उत्तर मिळालं की मी, इतरांनी स्वावलंबी व्हावं ह्यासाठी बरंच काही करु शकतो. इतरांना स्वतःच्या पायांवर ऊभं राहण्यासाठी जे जे शक्य आहे ते ते करुया. स्वतःच्या आणि इतरांचाही पाया भक्कम करुया. शरिराचा भार सांभाळणाऱ्या पायांचे आभार मानुया, पायांची काळजी घेऊया. एकमेकांसोबत काही अंतर पायी चालुया. (लेख क्र.६०९)

**– सुनील राऊत**
माळीगल्ली, भिंगार, अहिल्यानगर मो.९८२२७५८३८३

## आहारवेद – आरोग्य संवर्धन

### मेथी

आयुर्वेदानुसार सुश्रुताचार्यानी मेथी पित्त व वातनाशक, बृहणीय, बल्य, पोषक, रक्तशुद्धीकर, उष्ण, तिक्त गुणात्मक, दीपक, पाचक व वीर्यवर्धक सांगितली आहे. फॉस्फरस, लोह 'क' व 'ब' जीवनसत्वे आर्द्रता, प्रथिने, खनिजे, तंतुमय व पिष्टमय पदार्थ हे सर्व घटक विपुल प्रमाणात असतात.

उपयोग : १) मेथीमध्ये असणाऱ्या औषधी गुणधर्मामुळे तिचा आहारात नियमित वापर करावा. मेथी नियमित खाल्ल्यास संधिवात, आमवात, गुडघेदुखी व कंबरदुखी असे वातविकार होत नाहीत.

मेथी ही वातरोग, बाळंतरोग, मधुमेह, कावीळ, जुनाट ताप, नाक व डोळ्यांचे विकार, पंडुरोग गुणकारी आहे. म्हणून कर्तव्यदक्ष गृहिणीने भाजी, आमटी यांना फोडणी देताना जिरे, मोहरीसोबत मेथीच्या बियांचा आवर्जून वापर करावा.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ–महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर
मोबाईल नं– ८७९३४००४००

# वारी पंढरपूरची



पंढरीच्या वाटेवर ज्ञानोबा–तुकोबांच्या जयघोषात पावले पडत होती, पण एका तरुण वारकऱ्याच्या मनात मात्र विचारांचे काहूर माजले होते. वारीत चालताना प्रत्येकाच्या चेहऱ्यावरचा तो अलौकिक आनंद पाहून तो बुचकळ्यात पडला होता. शेवटी न राहवून विठ्ठलवाडीच्या मुक्कामात त्याने आपल्या वयोवृद्ध, सात्त्विक गुरूंना गाठले आणि चरणावर डोके ठेवून हट्ट धरला, महाराज, या वारीत सगळे म्हणतात जीवन सार्थकी लावायला हवे... पण या मानवी जीवनाचे खरे मूल्य काय? संसाराचा पसारा की देवाचे भजन? या जीवनाची खरी किंमत काय आहे, हे आधी मला समजावून सांगा!

संत ज्ञानेश्वरांच्या विचारधारेत मुरलेल्या त्या गुरूंनी स्मितहास्य केले. ते जाणत होते की, जीवनाचे मर्म पुस्तकी ज्ञानाने नाही, तर स्वानुभवाने समजते. त्यांनी आपल्या झोळीतून एक चकचकीत, नक्षीदार धोंडा (दगड) काढला आणि शिष्याच्या हातावर ठेवत म्हणाले, बाबा रे, या दगडाचे मूल्य बाजारात जाऊन पडताळून ये. जो जास्तीत जास्त जास्तीत जास्त याची किंमत काय असेल? एवढे फक्तबघून ये, पण एक नियम पक्का लक्षात ठेव–हा दगड कुणालाही विकायचा नाही, फक्त त्याची किंमत काय होऊ शकते, हे अजमावून परत यायचे.

गुरूंना वंदन करून तो तरुण बाजाराकडे निघाला. रस्त्याच्या कडेला एक भाजीवालेवाला माउली आपली टोपली घेऊन भाजी विकत बसलेला त्याला दिसला. शिष्याने तो दगड भाजीवाल्याला दाखवला आणि विचारले, भाऊ, या दगडाच्या बदल्यात तुम्ही मला काय द्याल? भाजीवाल्याने तो दगड हातात घेतला, उलथून–पालथून पाहिला आणि म्हणाला, तसा तर माझ्या काही कामाचा नाही हा पाषाण! पण माझ्या तराजूचे एक वजन हरवले आहे, त्यासाठी हा छान बसेल.

याच्या बदल्यात मी तुम्हाला दोन किलो ताजी वांगी आणि थोडी कोथिंबीर देऊ शकतो. शिष्याने मनात नोंद केली–'या जीवनाची, म्हणजेच या दगडाची किंमत काही शेर भाजी एवढीच आहे.' तो पुढे निघाला.

थोडे पुढे गेल्यावर त्याला फळांची वखार दिसली. शिष्याने तोच दगड फळविक्रेत्यासमोर ठेवला. फळवाल्याने त्या दगडाची चमक पाहिली. त्याला वाटले, हा वारकरी भुकेलेला दिसतोय आणि संकोचामुळे दगड विकायला काढलाय. तो दयाळू वाणीने म्हणाला, महाराज, दगड तर छान दिसतोय. मी याच्या बदल्यात तुम्हाला दहा रसाळ संत्री, डझनभर केळी आणि शिदोरीसाठी काही फळे देतो. तुमची भूक भागेल. शिष्याला नवल वाटले.

भाजीपेक्षा फळांच्या दुकानात या दगडाचे मूल्य थोडे वाढले होते. तो दगड परत घेऊन पुढे निघाला.

पुढे एका लोहाराची भट्टी होती. लोहाराने तो दगड ऐरणीवर ठेवून पाहिला, त्याची काठिण्य पातळी तपासली आणि म्हणाला, हा दगड मजबूत आहे, घणाचे घाव सोसेल. याच्या बदल्यात मी तुम्हाला एक उत्तम लोखंडी विळा किंवा कुदळ किंवा कोणतेही लोखंडी औजार देतो. शिष्याने तिथेही किंमत कळून घेतली आणि तो एका सराफाच्या (सोनाराच्या) दुकानात शिरला.

सोने–चांदीच्या चकचकाटात सराफाने जेव्हा तो दगड हातात घेतला, तेव्हा त्याचे डोळे विस्फारले! त्याने चष्मा नीट केला, दगडाला घासून पाहिले आणि आश्चर्याने म्हणाला, अहो वारकरी माउली, हा साधा दगड नाही, हा तर अत्यंत दुर्मिळ हिरा आहे! तुम्ही हा इथेच ठेवून द्या, मी तुम्हाला १०० सोन्याच्या मोहरा (सुवर्णमुद्रा) देतो! शिष्याचा स्वतःच्या कानांवर विश्वास बसेना. एका क्षणात भाजीच्या मोलाचा दगड शंभर सुवर्णमुद्रांचा झाला होता! पण गुरूंची आज्ञा आठवून त्याने दगड परत घेतला.

आता शिष्याची जिज्ञासा शिगेला पोहोचली होती. शेवटी तो नगराशेट कडे गेला, जो मौल्यवान रत्नांचा जळत–पळत जाणकार (रत्नपारखी) होता. त्या गादीवर बसलेल्या पारख्याने जसा तो दगड पाहिला, तसा त्याने ताडकन उठून त्या दगडाला आणि शिष्याला साष्टांग नमस्कार घातला! तो भारावून म्हणाला, स्वामी, हा पृथ्वीवरचा अमृततुल्य 'कुरुविंद–माणिक' (पद्मराग मणी) आहे! हा इतका अलौकिक आहे की, संपूर्ण जगाची दौलत जरी एका बाजूला ठेवली, तरी या रत्नाची किंमत मोजता येणार नाही! हा अनमोल आहे, अगणित आहे!

शिष्याची बुद्धी थक्क झाली.तो धावत–पळत गुरूंच्या चरणाशी आला. डोळ्यात अश्रू आणून त्याने घडलेला सगळा वृत्तांत गुरूंच्या चरणी अर्पण केला.

गुरू माउलींनी त्याला मायेने जवळ घेतले आणि पाठीवरून हात फिरवत म्हणाले, बाळा, समजले का जीवनाचे मूल्य? हे जीवनसुद्धा या दगडासारखेच आहे. जो माणूस संसाराच्या चिखलात अडकून राहतो, ज्याची बुद्धी फक्त भौतिक सुखात रमते, त्याला या जीवनाची किंमत फक्त 'भाजीपाल्या' एवढीच वाटते. तो फक्त खाणे, पिणे आणि जगणे यातच आयुष्य संपवतो.

लोहार आणि सराफासारखे लोक या जीवनाचा उपयोग काही अंशी सुखाची साधने मिळवण्यासाठी करतात. पण ज्याला या नरदेहाचे खरे मर्म कळते, जो विठ्ठल नामाच्या रंगात रंगून सुख–दुःखाच्या पलीकडे जातो आणि संसारात राहूनही अलिप्त राहतो, त्याला समजते की हे जीवन 'अनमोल' आहे! भगवंताची प्राप्ती करून घेणे, हेच या जीवनाचे परम मूल्य आहे.

गुरूंचे हे रसाळ आणि डोळे उघडणारे शब्द ऐकून शिष्याचे अज्ञान गळून पडले. टाळ–मृदंगाच्या गजरात त्याला आता वारीचा खरा अर्थ गवसला होता. त्याने गुरूंना कोटी कोटी वंदन केले आणि पुंडलिक वरदे हरी विठ्ठल... चा गजर करत तो वारीत आनंदाने नाचू लागला.



**रमेश देशपांडे**
९४२३७९३२२६

# प्रेरणादायी अक्षरधन

## असावे निर्भय







आकाशात एक ढग दिसतो. किती वेगवेगळी रूपे धारण करतो. मध्येच गुरगुरतो, तर केव्हा कडाडतो. लख्ख प्रकाशाने मध्येच सगळ्या दुनियेचे डोळे दिपवतो. केवढ्या वेगाने निघालेला असतो. कुठे निघालास रे पण ? अरे, त्याला ठाऊक आहे त्याचे गन्तव्य. तो नाही चुकवीत कधी त्याचे कर्तव्य. म्हणून तर उज्वल आहे त्याचे भवितव्य. माणसा, व्हायचेय तुला त्या ढगासारखे स्वच्छंद होय? यजुर्वेदाच्या काळापासून माणूस हेच सांगतोय. यजुर्वेदात म्हटलंय, मनसः काममाकूर्तिं वाचः सत्यमशीय पशूंना रूपमन्नास्यरसो यशः श्री श्रयतां मयि स्वाहा

माझ्या मनाला भावेल असे यश व शोभेल असे लावण्य लाभो. गोधन वाढो. त्यापायी घराला शोभा प्राप्त होवो. षड्रसयुक्त अन्न भोजनाला मिळो. महत्त्वाकांक्षा पूर्ण होवोत. पण त्यासाठी मी सत्याचा मार्ग सोडायला नको आणि त्याग करायलाही कधी न चुको. कष्ट व श्रम सहज झेलायला शिको.

हे सगळं त्या ढगाचेच ईप्सित. होय ना? पूर्ण झाल्यात ना त्या ढगाच्या कामना? तुझ्याही होतील रे या सगळ्या इच्छा पूर्ण मानवा. पण त्यासाठी गाठायला हवी ढगाची ती उंची, ढगाची ती गती, ती परोपकारी कृती. क्षितिजापलीकडेच आहे माणसा, तुला हवी ती दिव्य सृष्टी. जा तिथवर. लाभेल मग तुला तुष्टी, पुष्टी निसर्गानं असेच आदर्श उभे केले आहेत. कविवर्य भा.रा. तांबेंनी सूर्याचेही असेच अनासक्त, पण परोपकारी कर्म रेखाटलेले आहे. असक्त परि तू केलीस वणवण दिलेस जीवन हे नारायण मनी न धरिले सानथोरपण, समदर्शी तू खरा

एक तामीळ गोष्ट आहे. एक होता स्वार्थी कंजूष माणूस. पै पै जोडून जमवले त्याने धन, अहंकार आणि स्वार्थ यांचेच त्याला भान. पैसा जमल्यावर त्याने बांधले सुंदर घर आणि गेला तिथं राहायला.

पण त्याच रात्री यायला लागला आवाज, मी पडू? मी पडू ? घर बोलतंय ? घर पडतंय? तो घाबरला. ते घर सोडून गेला. घरावर खर्च झाला. आता काय करावे? त्याने ते घर एका मित्राला भाड्याने दिले. तो मित्र गरीब होता. पण परोपकारी होता. निर्भय. सत्यवादी, निःस्वार्थी व नीतीने चालणारा होता. तो त्या घरी राहायला गेला.

त्याच रात्री त्यालाही पुन्हा आवाज येऊ लागला. मी पडू? मी पडू ? त्याला कुणी दिसेना. कोण बोलतंय ? न घाबरता त्यानं विचारलं. उत्तर आलं नाही. तो शांतपणे अंथरुणावर पहुडला. पण पुन्हा आवाज आला, मी पडू? मी पडू? शेवटी तो म्हणाला, खुशाल पड !

आणि काय आश्चर्य! घराच्या छपरातून सोन्याच्या मोहरा पडल्या. रोज रात्री तोच आवाज आणि तसेच मोहरा पडणे. त्याने मोहरा उचलल्या. या आपल्या नाहीत म्हणून अनेक सामाजिक, धर्मकार्य करणाऱ्या धर्मार्थ संस्थांना मदत म्हणून देऊन टाकल्या. त्या कंजूष मित्राला हे कळले. पडू का? म्हणून विचारायचे आपलं घर आणि खरंच का मोहरा पडत ? तो एका रात्री त्या मित्राकडे झोपायला येतो म्हणाला. आणि मित्राने त्याला आनंदाने ये म्हटले. तो कंजूष, स्वार्थी, रात्री झोपायला तर गेला. पण मनात भय होते. तेवढ्यात त्याचा किंचित डोळा लागला आणि साप–विंचू पडताना दिसू लागले. तो उठला दचकून. आवाज आलाच तेवढ्यात 'मी पडू?' तो कंजूष ओरडला, नको नको, त्याचा भाडेकरू मित्र म्हणाला, 'का नको? अरे पड पड' आणि त्याचे न ऐकताच, हा कंजुष दार उघडून भर रात्री रस्तानं धावत आपल्या घरी पळाला.

इकडे रोजच्याप्रमाणे सोन्याच्या मोहरा पडल्या. स्वार्थ आणि भय यापायी जग दिसतं विंचूसर्पमय।

**– किशोर गांधी**

# संत जनार्दन स्वामी महाराज पालखी दिंडीचे भिंगारमध्ये स्वागत; जय हरी विठ्ठलच्या गजराने परिसर दुमदुमला

### वारकऱ्यांना रोप भेट देत पर्यावरण संवर्धनाचा संदेश, महापौर ज्योतीताई गाडे यांचा टाळ घेऊन दिंडीत सहभाग





नगर – आषाढी वारीच्या निमित्ताने पंढरपूरच्या दिशेने प्रस्थान केलेल्या श्री संत जनार्दन स्वामी महाराज (पालखी) पायी दिंडीचे भिंगारमध्ये आगमन होताच संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. 'जय हरी विठ्ठल... श्री हरी विठ्ठल', 'पुंडलिक वरदा हरी विठ्ठल' आणि 'श्री ज्ञानदेव तुकाराम' या नामघोषाने वातावरण दुमदुमून गेले. हरदिन मॉर्निंग ग्रुप आणि भिंगार राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने दिंडीचे उत्साहपूर्ण आणि पारंपरिक पद्धतीने स्वागत करण्यात आले.

दिंडीच्या स्वागतासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित असलेल्या महापौर ज्योतीताई गाडे यांनी स्वतः डोक्यावर तुळशी वृंदावन घेऊन, हातात टाळ घेत वारकऱ्यांसमवेत हरिनामाचा गजर केला. त्यांनी दिंडीत सहभागी होत महिलांसमवेत फुगडी खेळत भक्तीचा आनंद लुटला. त्यांच्या सहभागामुळे उपस्थितांमध्ये उत्साह निर्माण झाला होता.

या स्वागत सोहळ्यासाठी श्री विशाल गणपती देवस्थानचे विश्वस्त प्रा. माणिक विधाते, भिंगार राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष व हरदिन मॉर्निंग ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ, सर्वेश सपकाळ, प्रांजली सपकाळ, जहीर सय्यद, रमेश वराडे, दिलीप ठोकळ, अशोक पराते, ताराचंद ठोकळ, दीपक धाडगे, मच्छिंद्र बेरड, ह.भ.प. अनावडे महाराज, संपत बेरड, सुभाष पेंढुरकर, शिवाजी बेरड, रामनाथ गर्जे, शुभम भंडारी, दशरथ मुंडे, सखाराम अळकुटे, ओम माळगे, सिद्धूतात्या बेरड, ईवान सपकाळ, गोरक्षनाथ वामन, अमोल वागस्कर, संतोष बोबडे, नवनाथ मोरे यांच्यासह नागरिक, महिला व वारकरी उपस्थित होते.

दिंडीचे प्रमुख ह.भ.प. उद्धव महाराज आनंदे यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. तसेच पाहुण्यांच्या हस्ते दिंडीतील वारकऱ्यांना रोपांची भेट देण्यात आली. दिंडी मार्गावर वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्याचे आवाहन करण्यात आले. यानंतर पालखीतील पवित्र पादुकांचे पूजन महापौर ज्योतीताई गाडे, प्रा. माणिक विधाते तसेच सपकाळ परिवाराच्या वतीने करण्यात आले. वारकऱ्यांसह उपस्थित भाविकांनी रथातील पादुका डोक्यावर घेऊन हरिनामाच्या अखंड गजराने संपूर्ण भिंगार भक्तिमय झाले होते.

आनंदेवाडा, श्रीक्षेत्र देवगिरी–दौलताबाद (जि. छत्रपती संभाजीनगर) येथून निघालेली श्री संत जनार्दन स्वामी महाराज पालखी दिंडी आषाढी वारीसाठी पंढरपूरकडे प्रस्थान करत असून नगर–करमाळा मार्गे तिचा प्रवास सुरू आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही भिंगारकरांनी दिंडीचे स्वागत करून वारकरी परंपरेचा सन्मान केला.

प्रास्ताविकात संजय सपकाळ यांनी या दिंडीला अनेक दशकांची परंपरा असल्याचे सांगितले. भिंगार शहरात दरवर्षी दिंडीचे उत्साहात स्वागत केले जाते आणि हा उपक्रम सामाजिक सलोखा, भक्ती आणि सेवाभाव वृद्धिंगत करणारा असल्याचे त्यांनी नमूद केले.

ह.भ.प. उद्धव महाराज आनंदे म्हणाले, भिंगारचे वैशिष्ट्य म्हणजे येथील अबालवृद्ध दरवर्षी उत्साहाने दिंडीचे स्वागत करतात. वारकऱ्यांची सेवा ही थेट पांडुरंगापर्यंत पोहोचते, असा संत तुकाराम महाराजांचा संदेश आहे. त्याच भावनेतून भिंगारकर निस्वार्थ सेवा करीत असल्याचे ते म्हणाले.

प्रा. माणिक विधाते यांनी महाराष्ट्राच्या संतपरंपरेचा गौरव करताना वारकरी संप्रदाय हा राज्याच्या सांस्कृतिक वैभवाचा अविभाज्य भाग असल्याचे सांगितले. पांडुरंगाच्या भेटीसाठी निघालेल्या वारकऱ्यांची सेवा म्हणजे प्रत्यक्ष विठ्ठलाची सेवा असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.


महापौर ज्योतीताई गाडे म्हणाल्या की, आषाढी वारीमुळे शहरात भक्तीचे वातावरण निर्माण झाले आहे. वारकऱ्यांची सेवा करताना पांडुरंगाच्या भक्तीचा आनंद मिळतो. हरदिन मॉर्निंग ग्रुप पर्यावरण संवर्धनासाठी सातत्याने उत्कृष्ट कार्य करीत आहे. मला वारकरी परंपरेचा वारसा वडिलांकडून लाभला आहे. यावेळी त्यांनी स्वर्गीय आमदार शिवाजी कर्डिले यांच्या आठवणींना उजाळा दिला. त्यांच्या आठवणींनी त्या भावूक झाल्या.

कार्यक्रमाच्या शेवटी सपकाळ परिवाराच्या वतीने दिंडीतील सर्व वारकऱ्यांना अल्पोपहाराचे वाटप करण्यात आले. भक्ती, सेवा, संस्कृती आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा हा सोहळा रंगला होता.



नाशिक ते पंढरपूर अशी सायकल वारी करणाऱ्या वारकरी सायकलपटूंचे अहिल्यानगर शहरात मुस्लिम समाजाच्यावतीने स्वागत करताना उद्योजक हाजी करीम हुंडेकरी.

# श्री खाकीदास बाबा मठ ट्रस्टच्या वतीने १६ जुलैला भगवान श्री जगदीश रथयात्रा महोत्सवाचे आयोजन



नगर – आषाढ शुद्ध द्वितीयेचे औचित्य साधत श्री खाकीदास बाबा (माहेश्वरी) मठ ट्रस्ट, अहिल्यानगर यांच्या वतीने भगवान श्री जगदीश रथयात्रा महोत्सव १६ जुलै रोजी सायंकाळी ५ वाजता भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात येणार आहे.

शहरातील लालटाकी रोड येथील श्री खाकीदास बाबा (माहेश्वरी) मठ ट्रस्ट येथून भगवान श्री जगदीश यांच्या रथयात्रेला प्रारंभ होणार असून, आकर्षक सजविलेल्या रथात विराजमान भगवान श्री जगदीशांचे दर्शन घेण्यासाठी मोठ्या संख्येने भाविक उपस्थित राहण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. भजन, जयघोष आणि भक्तिमय वातावरणात ही रथयात्रा होणार आहे. या पवित्र सोहळ्याचे यजमान सत्यनारायण गोवर्धन झंवर हे असून, श्री खाकीदास बाबा (माहेश्वरी) मठ ट्रस्टचे अध्यक्ष तथा विश्वस्त दीपक काबरा यांनी समाजबांधव, नागरिक आणि भाविकांनी कुटुंबासह उपस्थित राहून भगवान श्री जगदीश यांचे दर्शन घ्यावे व रथयात्रा महोत्सवाची शोभा वाढवावी, असे आवाहन केले आहे.

आषाढ महिन्यातील या पवित्र धार्मिक सोहळ्यामुळे परिसर भक्तिरसाने न्हाऊन निघणार असून, भगवान श्री जगदीश यांच्या कृपाशीर्वादाचा लाभ घेण्यासाठी भाविकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# वारकरी कोणाच्या दारात सहज जात नाहीत ते माझ्या दारात येतात, हे माझे भाग्यच आहे

### हाजी करीम हुंडेकरी यांचे प्रतिपादन; सलग १४ वर्षे सायकल वारकऱ्यांचे स्वागत; सेवेला माजी पोलीस आयुक्त हरीश बैजल यांचा सलाम

नगर – वारकरी कोणाच्या दारात सहज जात नाहीत. ते माझ्या दारात येतात, हे माझे भाग्य आहे. परमेश्वराने दिलेल्या कृपेने ही सेवा करण्याची संधी मिळत आहे. मी नसतानाही माझी मुले ही परंपरा कायम ठेवतील. हुंडेकरी लॉनमध्ये कोणत्याही समाजाच्या धार्मिक कार्यक्रमासाठी आम्ही शुल्क घेत नाही. माणुसकी टिकली तरच समाज टिकेल, असे प्रतिपादन हाजी करीम हुंडेकरी यांनी केले. यावेळी वारकऱ्यांनी टाळ्यांचा कडकडाट केला.

आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर नाशिक ते पंढरपूर अशी सायकल वारी करणाऱ्या वारकरी सायकलपटूंचे अहिल्यानगर शहरात मुस्लिम समाजातील उद्योजक हाजी करीम हुंडेकरी यांच्या वतीने भक्तिभावाने व उत्साहपूर्ण वातावरणात स्वागत करण्यात आले. गेल्या सलग १४ वर्षांपासून सुरू असलेली ही सेवाभावी परंपरा यंदाही कायम राखत हुंडेकरी परिवाराने वारकऱ्यांच्या निवास, भोजन, अल्पोपहार आणि इतर सर्व सोयींची उत्कृष्ट व्यवस्था केली. धर्म, जात आणि पंथाच्या पलीकडे जाऊन माणुसकीचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

नाशिक सायकलिस्ट फाऊंडेशनच्या वतीने गेल्या चौदा वर्षांपासून नाशिक ते पंढरपूर सायकल वारीचे आयोजन करण्यात येते. सुरुवातीला अवघ्या ७५ सायकलपटूंनी सुरू झालेल्या या वारीत आज तब्बल ३५० सायकलपटू सहभागी होत आहेत. यामध्ये ५५ महिला सायकलपटूंचा समावेश असून, आठ दृष्टीहीन आणि एक पाय नसलेले तीन दिव्यांग टँडेम (डबल सीट) सायकलच्या माध्यमातून ही वारी पूर्ण करत आहेत. यंदाच्या वारीत तब्बल २०० नवीन सायकलपटूंनी सहभाग नोंदविला आहे.

या स्वागत सोहळ्यात नाशिक सायकलिस्ट फाऊंडेशनचे अध्यक्ष अमित घुगे, वारी प्रमुख दविंदरसिंग भेला, सचिव नितीन कोटकर, सायकल दिंडीचे संस्थापक तथा माजी पोलीस आयुक्त हरीश बैजल, वारी प्रमुख अश्विनी कोंडेकर यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी माजी पोलीस आयुक्त हरीश बैजल यांनी हुंडेकरी परिवाराच्या सेवाभावाचे विशेष कौतुक केले. ते म्हणाले, २०१४ मध्ये ७५ सायकलपटूंनी सुरू झालेल्या या वारीसोबत हुंडेकरी परिवार सुरुवातीपासून उभा आहे. वारीतील सहभागींची संख्या सातत्याने वाढत असताना 'तीनशे काय, तीन हजार वारकरी आले तरी त्यांची सेवा करू' ही त्यांची उदात्त भावना मनाला स्पर्श करणारी आहे. राष्ट्रीय एकात्मतेचे हे जिवंत उदाहरण असून, त्यांच्या सेवेतून खरी माणुसकी अनुभवायला मिळते.

यंदाची सायकल वारी 'हरितवारी, पर्यावरणपूरक वारी' या संकल्पनेसह अवयवदान जनजागृतीचा संदेश घेऊन पंढरपूरच्या दिशेने मार्गक्रमण करत आहे. पर्यावरण संवर्धन, आरोग्यदायी जीवनशैली आणि सामाजिक बांधिलकी यांचा संदेश देत ही वारी दरवर्षी हजारो नागरिकांचे लक्ष वेधून घेते. यावेळी अविरत १४ वर्षे सायकल वारकऱ्यांचे स्वागत करणाऱ्या हाजी करीम हुंडेकरी यांचा नाशिक सायकलिस्ट फाऊंडेशनच्या वतीने विशेष गौरव करण्यात आला. हुंडेकरी परिवाराच्या योगदानामुळे प्रत्येक सायकलपटूला नवचैतन्य मिळते, अशा भावना अनेक सायकलिस्टांनी व्यक्त केल्या.

स्वागत सोहळ्यावेळी युगंदर वाद्यपथकाच्या दणदणीत वादनाने परिसर भक्तिमय आणि उत्साहपूर्ण झाला. पहिल्यांदाच वारीत सहभागी झालेल्या युवक–युवतींनी आपले अनुभव कथन करत वारीमुळे मिळालेली ऊर्जा, शिस्त, भक्ती आणि सामाजिक जाणीव यांचा उल्लेख केला.

विशेष म्हणजे, या सायकल वारीचा पहिला मुक्काम दरवर्षी हुंडेकरी लॉनमध्येच असतो. या दिवसासाठी लॉन पूर्णपणे वारकऱ्यांसाठी राखीव ठेवले जाते. अगदी लग्नाचे बुकिंगही या दिवशी स्वीकारले जात नाही. वारकऱ्यांच्या निवासापासून नाश्ता, भोजन आणि आवश्यक सर्व सुविधांची मनापासून व्यवस्था केली जाते.

गेली १४ वर्षे अखंड सुरू असलेली ही सेवा केवळ आदरातिथ्य नसून, समाजात राष्ट्रीय एकात्मता, बंधुभाव आणि माणुसकीचा दीप तेवत ठेवणारा प्रेरणादायी उपक्रम ठरत आहे. या उपक्रमातून 'धर्मापेक्षा माणुसकी श्रेष्ठ' हा संदेश दिला जात आहे.




स्टेट लेव्हल गोलबॉल चॅम्पियनशिपमध्ये विजय मिळविणारा अनामप्रेमचा संघ.

# 'राज्यस्तरीय गोलबॉल स्पर्धे'मध्ये अनामप्रेमच्या विद्यार्थिनींचा विजय

नगर – दिव्यांगांच्या शिक्षण आणि सर्वांगीण सक्षमीकरणासाठी कार्यरत असलेल्या अनामप्रेम संस्थेच्या विद्यार्थिनींनी राज्यस्तरीय गोलबॉल स्पर्धेत नेत्रदीपक कामगिरी करत संस्थेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. पॅरा ब्लाइंड स्पोर्ट्स असोसिएशन, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने उल्हासनगर (मुंबई) येथे नुकत्याच पार पडलेल्या स्टेट लेव्हल गोलबॉल चॅम्पियनशिपमध्ये अनामप्रेमच्या संघाने आपल्या खेळाची चुणूक दाखवून दिली.

२६ ते २८ जून २०२६ दरम्यान आयोजित या स्पर्धेत अनामप्रेमच्या संघाने सुरुवातीपासूनच आक्रमक पवित्रा घेतला होता. स्पर्धेच्या पहिल्या सामन्यात मुंबईविरुद्धच्या लढतीत विद्यार्थिनींनी १९ गोल करत दणदणीत विजय मिळवला. त्यानंतर झालेल्या नागपूर विरुद्धच्या दुसऱ्या सामन्यातही ११ गोलची नोंद करत प्रतिस्पर्धी संघावर निर्विवाद वर्चस्व गाजवले. अनामप्रेमच्या खेळाडूंचे अचूक नियोजन आणि सांघिक समन्वय या विजयाचे मुख्य सूत्र ठरले. या यशस्वी संघात कल्पना कदम, आरती दामोदर, भाग्यश्री उत्तेकर आणि राधा यादव यांचा समावेश आहे. या विद्यार्थिनींच्या यशामागे त्यांचे कठोर परिश्रम आणि जिद्द असल्याचे दिसून आले. या संघाला डॉ. मेघना मराठे, अभय रायकवाड आणि आनंद माळवे यांचे मार्गदर्शन लाभले.

विद्यार्थिनींच्या या दैदीप्यमान यशाबद्दल संस्थेचे अजित माने, डॉ. गिरीश कुलकर्णी, डॉ. प्रकाश शेठ, डॉ. बापूसाहेब कांडेकर, डॉ. रविंद्र सोमाणी, डॉ. सायली सोमण, राधाताई कुलकर्णी, सीए अशोक पितळे, अविनाश बोपर्डीकर, नितीन थाडे आणि अनिल गावडे यांनी विजयी संघाचे अभिनंदन केले आहे. यापुढील राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्येही अशाच प्रकारची चमकदार कामगिरी करत विद्यार्थिनींनी राज्याचा नावलौकिक वाढवावा, अशी अपेक्षा पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# एलिव्हेशनचे नवे युग : स्टडी टूरमधून उलगडलं आधुनिक एलिव्हेशनचं जग

## घर, बंगला आणि कमर्शियल बिल्डिंगसाठी योग्य ACP पॅनल कसे निवडावे?







एखाद्या शहराची ओळख त्या शहरातील रस्ते, बागा किंवा चौकांवरून होतेच; पण त्या शहरातील सुंदर इमारतीही तितक्याच लक्ष वेधून घेतात. एखाद्या घरासमोरून किंवा व्यावसायिक इमारतीसमोरून जाताना आपण नकळत म्हणतो, वा ! काय सुंदर इमारत आहे ! त्या कौतुकामागे केवळ रंग नसतो, तर संपूर्ण एलिव्हेशनची कल्पक रचना असते.

**स्टडी टूरमधून उलगडलं आधुनिक एलिव्हेशनचं जग :**

गेल्या काही वर्षांत वास्तुकलेच्या क्षेत्रात मोठे बदल झाले आहेत. पूर्वी साध्या प्लास्टर आणि रंगावर भर दिला जात असे. आता मात्र आधुनिक साहित्य, नवीन तंत्रज्ञान आणि आकर्षक डिझाईन यांच्या साहाय्याने इमारतींचा दर्शनी भाग अधिक देखणा आणि टिकाऊ बनवला जात आहे. या बदलाचा जवळून अभ्यास करण्यासाठी मला अलीकडेच ACP पॅनल्सची निर्मिती करणाऱ्या एका नामांकित कंपनीला स्टडी टूरद्वारे भेट देण्याची संधी मिळाली.

कारखान्यात प्रवेश करताच सर्वप्रथम लक्ष वेधून घेतलं तेथील शिस्तबद्ध कामकाजाने. अत्याधुनिक यंत्रसामग्री, प्रत्येक टप्प्यावर केली जाणारी गुणवत्ता तपासणी, प्रशिक्षित कर्मचारी आणि उत्पादनातील अचूकता पाहून आधुनिक उद्योग किती वेगाने बदलत आहेत याची जाणीव झाली. आपण बाहेरून पाहतो ते एक सुंदर एलिव्हेशन असतं; पण त्यामागे किती नियोजन, संशोधन आणि तांत्रिक कौशल्य असतं, हे प्रत्यक्ष पाहिल्यावरच समजतं.

या भेटीदरम्यान विविध प्रकारचे ACP पॅनल्स, त्यांचे रंग, टेक्स्चर, जाडी, उपयोग आणि बसवण्याच्या पद्धती यांची माहिती मिळाली. लाकडासारखा भास देणारे फिनिश, दगडासारखा पोत, मेटॅलिक लूक, मॅट आणि ग्लॉसी पर्याय – हे सर्व पाहताना आधुनिक वास्तुकलेने किती मोठी झेप घेतली आहे, याची प्रचीती आली.

आज अनेकजण घर बांधताना किंवा इमारतीचे नूतनीकरण करताना इंटरनेटवर माहिती शोधतात. अनेकदा जाहिराती जास्त दिसतात; पण योग्य माहिती कमी मिळते. कोणते साहित्य वापरावे? कोणता पर्याय जास्त टिकतो? देखभाल किती लागते? खर्च कसा ठरतो? असे अनेक प्रश्न सामान्य माणसाच्या मनात असतात. या स्टडी टूरनंतर मला वाटले की, ही माहिती सोप्या मराठीत लोकांपर्यंत पोहोचली पाहिजे.

याच विचारातून एलिव्हेशनचे नवे युग ही लेखमाला सुरू करण्याचा निर्णय घेतला. या मालिकेत कोणतीही अवघड तांत्रिक भाषा न वापरता, प्रत्यक्ष अनुभवाच्या आधारे माहिती देण्याचा प्रयत्न असेल. घर बांधणारे, बिल्डर्स, आर्किटेक्ट, इंटिरिअर डिझायनर्स तसेच बांधकाम क्षेत्राची आवड असलेले वाचक – सर्वांसाठी ही मालिका उपयुक्त ठरेल, अशी अपेक्षा आहे.

आज एलिव्हेशन हा केवळ सजावटीचा विषय राहिलेला नाही. तो वास्तूची ओळख आहे. चांगले एलिव्हेशन इमारतीचे सौंदर्य वाढवते, बाजारमूल्य वाढवते आणि त्या वास्तूला वेगळेपण देते. त्यामुळे साहित्याची योग्य निवड करणे अत्यंत आवश्यक ठरते. ACP पॅनल्स हे अशाच आधुनिक साहित्यांपैकी एक असून, त्याचा वापर दिवसेंदिवस वाढत आहे.

या स्टडी टूरमध्ये एक गोष्ट विशेष जाणवली – उत्तम दर्जाचे साहित्य तयार करणे जितके महत्त्वाचे आहे, तितकीच त्याची योग्य बसवणी आणि नियोजनही महत्त्वाचे आहे. उत्कृष्ट साहित्य वापरूनही चुकीची बसवणी झाली तर अपेक्षित परिणाम मिळत नाही. त्यामुळे साहित्य आणि कौशल्य या दोन्ही गोष्टींचा समन्वय आवश्यक आहे.

घर, बंगला आणि कमर्शियल बिल्डिंगसाठी योग्य ACP पॅनल कसे निवडावे ?

सुरुवातीला आपण आधुनिक एलिव्हेशनचे महत्त्व आणि स्टडी टूरमधून मिळालेला अनुभव जाणून घेतला. वाचकांना एक महत्वाचा प्रश्न पडला असेल – ACP पॅनल लावायचं ठरवलं, पण योग्य पॅनल कसं निवडायचं ? हा प्रश्न खरोखरच महत्त्वाचा आहे. कारण सुंदर दिसणारे प्रत्येक पॅनल दर्जेदार असेलच, असे नाही.

आज बाजारात अनेक कंपन्यांचे ACP पॅनल्स उपलब्ध आहेत. रंग, डिझाईन आणि किंमत यामध्ये मोठी विविधता आहे. त्यामुळे फक्त कमी किंमत किंवा आकर्षक रंग पाहून निर्णय घेणे योग्य ठरत नाही. योग्य ACP निवडताना काही महत्त्वाच्या गोष्टी लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

सर्वप्रथम, इमारतीचा प्रकार ठरवा. घर, बंगला, हॉस्पिटल, शोरूम, हॉटेल किंवा व्यावसायिक इमारत – प्रत्येक ठिकाणची गरज वेगळी असते. घरासाठी साधेपणा आणि टिकाऊपणा महत्त्वाचा असतो, तर व्यावसायिक इमारतीसाठी आकर्षक आणि लक्षवेधी एलिव्हेशन अधिक महत्त्वाचे ठरते.

दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे पॅनलची गुणवत्ता. बाहेरून सर्व पॅनल्ससारखे दिसू शकतात; पण त्यांच्या आतील रचना, ॲल्युमिनियमची जाडी, कोटिंग आणि उत्पादनाची गुणवत्ता यात मोठा फरक असतो. त्यामुळे नेहमी विश्वासार्ह कंपनीचे आणि दर्जा सिद्ध केलेले उत्पादन निवडावे.

तिसरी गोष्ट म्हणजे हवामानाचा विचार. आपल्या भागात उन्हाळा तीव्र असतो, पाऊसही भरपूर पडतो. अशा परिस्थितीत रंग न फिका पडणारे, गंज न धरणारे आणि हवामानाचा परिणाम कमी होणारे ACP पॅनल निवडणे आवश्यक आहे.

रंग आणि फिनिश निवडतानाही घाई करू नका. आज वुडन, स्टोन, मेटॅलिक, मॅट, ग्लॉसी अशा अनेक फिनिश उपलब्ध आहेत. प्रत्येक फिनिश प्रत्येक इमारतीला शोभून दिसेलच असे नाही. इमारतीचा आकार, परिसर, प्रकाश आणि वास्तूची शैली यांचा विचार करून निवड केली तर एलिव्हेशन अधिक आकर्षक दिसते.

अनेक ग्राहक फक्त स्वस्त पर्याय शोधतात. पण एलिव्हेशन हा दरवर्षी बदलण्याचा विषय नाही. एकदा केलेली गुंतवणूक अनेक वर्षे टिकणारी असावी. त्यामुळे केवळ सुरुवातीचा खर्च न पाहता, दीर्घकालीन टिकाऊपणा आणि देखभालीचा खर्चही लक्षात घ्यावा.

बसवणी करणारी टीम हा देखील तितकाच महत्त्वाचा भाग आहे. उत्तम दर्जाचे पॅनल वापरूनही चुकीच्या पद्धतीने बसवणी झाली तर त्याचा परिणाम सौंदर्यावर आणि टिकाऊपणावर होतो. त्यामुळे अनुभवी आणि प्रशिक्षित टीमकडूनच काम करून घ्यावे.

स्टडी टूरदरम्यान एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली–मोठ्या कंपन्या केवळ उत्पादनावर भर देत नाहीत, तर योग्य इंस्टॉलेशन आणि तांत्रिक मार्गदर्शनालाही तितकेच महत्त्व देतात. म्हणूनच ग्राहकांनी फक्त साहित्यच नव्हे, तर संपूर्ण प्रणालीकडे लक्ष दिले पाहिजे.

घर बांधताना किंवा इमारतीचे नूतनीकरण करताना आर्किटेक्ट, इंटिरिअर डिझायनर आणि साहित्य पुरवठादार यांच्यात योग्य समन्वय असेल, तर अंतिम परिणाम अधिक दर्जेदार मिळतो. एलिव्हेशन हा केवळ बाह्य देखावा नसून, इमारतीच्या व्यक्तिमत्त्वाचा महत्त्वाचा भाग आहे.

ACP पॅनल निवडताना स्वतःला काही साधे प्रश्न विचारा–

हे पॅनल माझ्या इमारतीच्या वापराला योग्य आहे का?

त्याची गुणवत्ता प्रमाणित आहे का?

कंपनीची विक्रीनंतरची सेवा उपलब्ध आहे का?

बसवणी कोण करणार आहे?

पुढील १०–१५ वर्षांचा विचार करून मी निर्णय घेत आहे का?

या लेखमालेतील पुढील भागात आपण ACP पॅनल म्हणजे काय? ते कसं तयार केलं जातं? आधुनिक इमारतींमध्ये त्याला एवढं महत्त्व का मिळालं आहे? त्याची रचना, प्रकार, फायदे, मर्यादा, खर्च, देखभाल, आधुनिक डिझाईन ट्रेंड आणि प्रत्यक्ष प्रकल्पांमधील अनुभव अशा अनेक विषयांवर सविस्तर चर्चा करू.

या लेखमालेचा उद्देश केवळ माहिती देणे नाही, तर वाचकांना योग्य निर्णय घेण्यासाठी मार्गदर्शन करणे आहे. प्रत्यक्ष पाहिलेल्या गोष्टी, तज्ज्ञांशी झालेल्या चर्चा आणि बांधकाम क्षेत्रातील अनुभव यांच्या आधारे ही मालिका पुढे नेण्याचा प्रयत्न असेल.

(टीप : या लेखासाठी युरोबाँड इंडस्ट्रीज, दमन येथील उत्पादन प्रकल्पाला दिलेल्या अभ्यासभेटीचा संदर्भ घेण्यात आला आहे. तेथे आधुनिक उझ  तंत्रज्ञान, उत्पादन प्रक्रिया आणि तज्ञांचे मार्गदर्शन अनुभवण्याची संधी दिल्याबद्दल युरोबाँड कंपनीचे मनपूर्वक आभार.)



- Pravin Kisanrao Padwal.
"Reflection interiors"
padwalpravin339@gmail.com
Cell : 9309083815.
Vipasha Apartment , A-4 ,
Sawedi, Ahilyanagar .
Bhaghyshri society C-3,
Raikernagar, Dhayri,
Sinhagad road, Pune 41.

Architects, Engineers & Surveyors
Association Ahilyanagar


## जाहीर नोटीस

**या जाहीर नोटिसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्ठात नमूद केलेल्या मिळकतीबाबत दि.२७ जुन २०२४ रोजी मिळकतीचे मालक संदीप सुभाष जाधव, सुशांत सुभाष जाधव, सुरज सुभाष जाधव आणि सुभाष रामनाथ जाधव यांचे सोबत आमच्या अशिलांचे साठेखत (Agreement to Sale) झालेले असून सदरचे साठेखत मे.नोटरी पब्लिक यांचेकडे अ.नं.२६५/२०२४ अन्वये नोंदविलेले आहे. सदर मिळकतीच्या मालकांनी या साठेखतातील अटी व शर्तीची पूर्तता करून खरेदीखत करून देण्याचे निश्चित झालेले होते व आहे. तथापि संदीप सुभाष जाधव वगैरे यांनी आमच्या अशिलांना फसवून सदर मिळकत सुरज संतोष गुगळे व सरिता अभय श्रीश्रीमाळ यांना परस्पर विक्री केलेली आहे. त्याबाबत आमच्या अशिलांना नुकतीच माहिती झालेली असून त्याविरुद्ध आमचे अशील दिवाणी तसेच फौजदारी स्वरूपाची कारवाई करणार आहेत. तरी सदर मिळकतीबाबत कोणीही कोणताही व्यवहार करू नये. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून प्रस्तुतची जाहीर नोटीस दिली असे.**

**परिशिष्ठ**

**मिळकतीचे वर्णन :–**

जिल्हा अहिल्यानगर (अहमदनगर) पोटतुकडी व तालुका अहिल्यानगर (नगर) पैकी, अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील मौजे **केंडगाव** येथील खालील वर्णनाची मिळकत–

| गट नं. | क्षेत्र | आकार |
|---|---|---|
| ३४८/१ | १ हे. १४ आर | १रु. ३७पैसे |
| | पो.ख. ० हे. ०२ आर | |
| | एकूण १ हे. १६ आर | |

यासी चतु:सीमा–
पूर्वेस – गट नं.५१६ दक्षिणेस – गट नं.३४८/२
पश्चिमेस – शिव रस्ता उत्तरेस – गट नं.३५७
येणेप्रमाणे चतु:सीमापूर्वक वर्णनाची संपूर्ण शेतजमीन मिळकत खाली काही एक राखून न ठेवता.

दि.११/०७/२०२६
अहिल्यानगर

**ॲड. हेमंत कराळे,**
**ॲड. वैशाली कराळे**
ऑ.नं. २१६, कोर्टयार्ड, तारकपूर स्टॅण्डसमोर,अहिल्यानगर.
मो. नं. – ७०२०६८१२९०, ९४२२२२०७०२


# अहिल्यानगर येथे १२ जुलै रोजी मराठा वधू-वर परिचय मेळाव्याचे आयोजन

नगर – स्वराज्य बहुउद्देशीय विकास संस्था संचलित स्वराज्य मराठा वधू–वर सूचक मंडळाच्या वतीने मराठा समाजातील विवाहेच्छुक युवक–युवतींसाठी १२ जुलै रोजी मराठा वधू–वर परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा मेळावा जाधव लॉन (नंदराज केटरर्स संचालित), नगर–कल्याण रोड, अहिल्यानगर येथे सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत होणार असून सहभागींची रिपोर्टिंग वेळ सकाळी ९.३० अशी आहे, अशी माहिती कानिफनाथ देवस्थान ट्रस्ट, मढीचे सहसचिव तथा उद्योजक ॲड. शिवजीत डोके यांनी दिली.

मेळाव्यास भरोसा सेल, अहिल्यानगरच्या पोलीस निरीक्षक सौ. प्रियंका आठरे यांची विशेष उपस्थिती लाभणार असून महिला व बालकल्याण समितीच्या सदस्या ॲड. सौ. अनुराधा येवले या विवाह, कुटुंब व्यवस्था आणि सामाजिक जबाबदारी विषयावर मार्गदर्शन करणार आहेत.

मेळाव्यात सहभागी होणाऱ्या विवाहेच्छुक युवक–युवतींनी पालकांसह उपस्थित राहावे. सहभागी होताना सर्व आवश्यक माहिती असलेला बायोडाटा, दोन मोठ्या आकाराचे पूर्ण फोटो, पासपोर्ट फोटो, आधारकार्ड व पॅनकार्ड ही आवश्यक कागदपत्रे सोबत आणावीत, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

समाजातील युवक–युवतींना योग्य जीवनसाथी मिळावा, परस्पर संवाद वाढावा आणि विवाह जुळवणीसाठी विश्वासार्ह व्यासपीठ उपलब्ध व्हावे, या उद्देशाने या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामुळे मराठा समाजातील विवाहेच्छुक युवक–युवती व त्यांच्या पालकांनी या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

अधिक माहितीसाठी स्वराज्य बहुउद्देशीय विकास संस्था (मो. ९४०४८५८९०९) तसेच स्वयंसेवक ॲड. व इंजि. कैलाश दिघे (९८२२३०४८८१), अनंत देठे (९५१८३६८४५२) आणि श्रीपाद दगडे (९३७१११३२१२) यांच्याशी संपर्क साधावा.


## जाहीर प्रगटन

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस विशेषता:सदर मिळकतीचे विद्यमान मालक **शेख हाजराबी शेख इकबाल** रा. सर्व्हे नं.३४१/३ प्लॉट नं. १३,अभिलाषा कॉलनी, , मुकूंदनगर अहमदनगर यांना कळविणेत येते की,

खाली परिशिष्ट नमुद केलेल्या मिळकतीच्या उत्तर बाजुस **मौजे भिंगार येथील अभिलाषा कॉलनी भागातील सर्व्हे नं. ३४१/३ मधील प्लॉट नं. १४ याचे क्षेत्रफळ २१०.०० चौ. मी.सदर प्लॉटवर बांधकाम झालेल्या अभिलाषा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या अहमदनगर या रो.हाऊस स्कीम मधील रो.हाऊस ब्लॉक नं. बी / ८ याचे प्लॉटचे क्षेत्र ५४.९० चौ.मी. व त्यावरील बांधकाम क्षेत्र २६.३६ चौ.मी.बाकी मागे पुढे व दक्षिण बाजुला पुर्व – पश्चिम लांबीची व उत्तर – दक्षिण रुंदीची खुली जागा ही आमचे अशिल नामे इनामदार इम्रान अब्बास** यांची स्वसंपादीत खरेदी मालकीची आहे. तसेच सदर आमचे अशिल इनामदार इम्रान अब्बास यांचे मालकीच्या मिळकतीस दक्षिण बाजुला लागुन खाली परिशीष्टात नमुद केलेली विद्यमान मालक **शेख हाजराबी शेख इकबाल** यांचे मालकीची मिळकत असुन आमचे अशिल यांचे मालकीचे **मिळकतीचे दक्षिण बाजुस व विद्यमान मालक शेख हाजराबी शेख इकबाल यांचे उत्तर बाजुस पुर्व – पश्चिम लांबीची व उत्तर – दक्षिण रुंदीची आमचे अशिल यांचे मालकीचे प्लॉटचे साईड मार्जिन क्षेत्र असुन सदर क्षेत्रा मध्ये विद्यमान मालक शेख हाजराबी शेख इकबाल यांनी बेकायदेशीर अतिक्रमण केले आहे.** तसेच आमच्या अशिलास नुकतीच खात्रीशीर माहिती मिळाली आहे की, विद्यमान मालक हे चुकीची माहिती देवुन त्यांचे मालकीचे १७२.०५ चौ.मी. (१८५२ चौ.फुट) असुन लोकांची दिशाभुल करुन आमचे अशिल यांचे प्लॉटचे क्षेत्रामध्ये जे अतिक्रमण केलेले क्षेत्र आहे ते क्षेत्र हे त्यांचे मालकीचे आहे असे सांगुन वर नमुद केलेली मिळकत विक्री करण्याचे प्रयत्न करीत आहे.वास्तवीक पाहता सदर वर नमुद केलेली मिळकत व आमचे अशिल यांचे मिळकती मध्ये **पुर्व – पश्चिम लांबीची व उत्तर – दक्षिण रुंदीची** आमचे अशिल यांचे प्लॉटची खुली जागा / साईड मार्जिन आहे. तरी सदर परिशीष्टात नमुद केलेली मिळकतीचे विद्यमान मालक **शेख हाजराबी शेख इकबाल** यांना व तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांचे प्लॉटवर अतिक्रमण करुन सदरची मिळकत इतर तिऱ्हाईत व्यक्तीस खरेदी देण्याचा प्रयत्न करीत आहे. सदर मिळकती बाबत कोणीही कोणतेही प्रकारचे खरेदी, विक्री, गहाण, दान, बक्षीस, साठेखत,लिव्ह ॲण्ड लायसेन्सी, कुलमुखत्यारपत्र, हस्तांतरणाचे कोणतेही प्रकारचे व्यवहार विद्यमान मालक **शेख हाजराबी शेख इकबाल** यांच्या बरोबर करु नये व सदर मिळकती बाबत व्यवहार केल्यास सदरचे व्यवहार व केलेले बेकायदेशीर दस्त आमचे अशिल **इनामदार इम्रान अब्बास** यांचेवर मुळीच बंधनकारक राहणार नाही व संबंधीतांना सदर मिळकतीची कुठल्याही प्रकारे कायदेशीर मालकी ,ताबा, हितसंबंध व टायटल प्राप्त होणार नाही याची तमाम लोकांना या जाहिर प्रगटनद्वारे कळविले असुन या उपरही कोणीही कोणतेही प्रकारचा व्यवहार विद्यमान मालक यांचे बरोबर केल्यास आमचे अशिल हे विद्यमान मालक व खरेदी घेणार यांच्या विरुध्द योग्य ती कायदेशीर कारवाई करतील व होणाऱ्या खर्चास व परीणामास विद्यमान मालक हे स्वत:हा जबाबदार राहतील.याची नोंद घ्यावी. विनाकारण कोणाचीही आर्थिक फसवणुक होऊ नये या उद्देशाने आमचे अशिलाने सदर जाहिर प्रगटन प्रसिध्दीस दिले असे.

**परिशिष्ट**

**मिळकत वर्णन :**डि.।। अहिल्यानगर/अहमदनगर सब. डि.।। ता. नगर पैकी अहिल्यानगर/ अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील मौजे भिंगार येथील अभिलाषा कॉलनी भागातील सर्व्हे नं. ३४१/३ मधील प्लॉट नं. १३ याचे क्षेत्रफळ १७२.०५ चौ. मी. व त्यावरील संपुर्ण बांधकामासह मिळकत विद्यमान मालक यांचे मिळकती बाबत.

**यासी चतु:सिमा–**
पुर्व – प्लॉट नं.२३ दक्षिण – ९.०० मीटर रस्ता
पश्चिम – ६.०० मीटर रस्ता उत्तर – प्लॉट नं.१४ ची मोकळी जागा (साईड मार्जिन)

दि.११/०७/२०२६
अहमदनगर.

**ॲड. नाजीम अहमद इस्माईल शेख**
**कुरेशी फैजान फारुक**
जुने कलेक्टर ऑफीसजवळ डावरे गल्ली, अहमदनगर
मो. ९८८१४३१८६०,७२७६२५२४७८



## जिल्हाधिकारी कार्यालय, अहिल्यानगर

भूमि संपादन, पुनर्वसन व पुर्नवसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम ११ खालील प्राथमिक अधिसूचना

## अधिसूचना

क्र. भूसं/मौजे राशीन ता. कर्जत जि. अहिल्यानगर/एलएक्यू/एसआर/६/२०२५

ज्या अर्थी भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (ड) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्र. संकीर्ण–२०२०–प्र.क्र.५/अ–३ दिनांक ०३ ऑगस्ट २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश उक्त अधिसूचना'' असा करण्यात आला आहे.) याव्दारे असे अधिसूचीत केले आहे की, उक्त अधिनियमांच्या कलम ३ च्या खंड (झेड ए) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी एखाद्या जिल्ह्यातील १०,००० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरीता जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या जिल्हाधिकारी अहमदनगर जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यास यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमीन (यात यापुढे जिचा निर्देश ''उक्त जमिनी'' असा करण्यात आला आहे) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यापुढे ज्याचा निर्देश'' उक्त सार्वजनिक प्रयोजन असा करण्यात आला आहे) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे असे वाटते, ज्याच्या स्वरुपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची दोनमध्ये दिलेले आहे. आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम (१) च्या तरतुदीन्वये याव्दारे असे अधिसुचीत करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमि संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची तीन मध्ये दिलेली आहेत; आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोटकलम (१) अन्वये पुनर्वसन व पुर्नवसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशिल, यासोबत जोडलेल्या अनुसूची पाच मध्ये दिलेला आहे; त्याअर्थी आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोटकलम ५ अनुसार कोणतीही व्यक्ती, हि अधिसुचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकांपासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमीनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही; परंतु, काही जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिकाऱ्यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमुद करुन अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल; परंतु आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुध्दीपुरस्पर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्यांकडून भरपाई दिली जाणार नाही. तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम (५) अ नुसार, जिल्हाधिकारी भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम २०१४ (यात यापुढे ज्यांचा निर्देश उक्त नियम असा करण्यात आला आहे. यांच्या नियम १० च्या उपनियम (३) व्दारे विहित केल्याप्रमाणे भूमिअभिलेखाच्या अद्यावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

त्याअर्थी उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखात्रील जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी (भूसंपादन क्र. ३), अहिल्यानगर यास पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसूची – एक/जमीनीचे वर्णन**

गाव – राशीन ता–कर्जत जिल्हा–अहिल्यानगर

| अ.क्र. | भूमापन किंवा गट क्रमांक | आवश्यक जमिनीचे अंदाजित क्षेत्र (आर.हे.) |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | १५५३ | २.१३ |
| २ | १५५२ | ०.३० |
| ३ | १५५१ | ०.३० |
| ४ | १५५० | ०.३७ |
| ५ | १५४७ | ०.३९ |
| ६ | १५४६ | ०.३८ |
| ७ | १५४५ | ०.४४ |
| ८ | १५४४ | ०.२७ |
| ९ | १५४३ | ०.४९ |
| १० | १५४२ | ०.८२ |
| ११ | १५८९ | ०.५३ |
| १२ | १५३६ | ०.१५ |
| १३ | १५३५ | ०.३० |
| १४ | १६०१ | ०.६७ |
| १५ | १६०० | ०,११ |
| १६ | १६०२ | ०.१६ |
| १७ | १६०३ | ०.३४ |
| | एकूण क्षेत्र | ८.१५ |

– **अनुसूची – दोन :** सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण

**प्रकल्पाचे नाव** – कुकडी डावा कालवा चिलवडी शाखा कालव्यावरील राशिन वितरीका कि.मी. ५ आणि राशीन वितरीकेची लघुवितरीका क्र .५ व ७ (एस.आर.क्र.२१/२००७) चे बांधकाम

**प्रकल्पाचे वर्णन** – कुकडी डावा कालवा चिलवडी शाखा कालव्यावरील राशिन वितरीका कि.मी. ५ आणि राशीन वितरीकेची लघुवितरीका क्र. ५ व ७ (एस.आर.क्र.२/२००७) चे बांधकामाकरिता मौजे राशीन, ता.कर्जत. जि.अहिल्यानगर येथील एकूण ८.५ हे.आर जमीन संपादित करणे.

समाजाला मिळणारे लाभ – सिंचन सुविधा

**अनुसूची– तीन** : बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे लागू नाही.

**अनुसूची–चार** : (सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणाऱ्या अभिकरणाने दिलेला) सामाजिक प्रभाव निर्धाराचा सारांश, प्रस्तुत प्रकरणी मा विभागीय आयुक्त नाशिक यांचे कार्यालय (भुसंपादन शाखा) यांचे पत्र क्र. जाक्र भुस/कार्या–३/एसआयएसीआर–५१/२०२६/ई–ऑफिस क्र.१८०१७/८३/२०२६ दि.१६/०५/२०२६ नुसार भुमि संपादन, पुनर्वसन पुनर्वसाहत करताना उचित भरपाईचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ प्रकरण दोनच्या व प्रकरण तीनच्या तरतुदी लागु करण्यापासून सुट देणेत आलेली आहे.

**अनुसूची–पाच**

अ. प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्याचे पदनाम : लागु नाही.

ब. प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्याचे पदनाम : लागु नाही.

क. ज्या अधिसूचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे. त्या अधिसुचनेचा तपशिल : लागु नाही.

टीप – उक्त जमिनीच्या आराखड्याचे उपजिल्हाधिकारी (भूसंपादन क्र. ३), अहिल्यानगर यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

दिनांक – २२.०६.२०२६,
ठिकाण – अहिल्यानगर

जिमाका /नगर/जाहि/५७/२०२६

**सुभाष ए. दळवी**
प्र.उपजिल्हाधिकारी भूसंपादन क्र. ३, जिल्हाधिकारी कार्यालय, अहिल्यानगर


# 'उज्वल स्टोन क्रेशर ॲण्ड सप्लायर'चे १२ जुलै रोजी मदडगाव येथे उद्घाटन

नगर – पाथर्डी रोडवरील मदडगाव येथे उज्वल स्टोन क्रेशर ॲण्ड सप्लायर या नवीन फर्मचा शुभारंभ १२ जुलै रोजी होणार आहे. या नवीन उद्योगाचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे भाजपा प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांच्या हस्ते होणार असल्याची माहिती संचालक अरुण मुंढे यांनी दिली.

या उद्घाटन सोहळ्यासाठी आमदार संग्राम जगताप, आमदार विठ्ठलराव लंघे, आमदार विक्रम पाचपुते, आमदार अक्षय कर्डिले, आमदार अमोल खताळ आणि आमदार काशिनाथ दाते उपस्थित राहणार आहेत.

या प्रकल्पाच्या नियोजनाबाबत बोलताना उदय मुंढे म्हणाले, योग्य दर आणि विश्वासार्ह व्यवहार ही आमच्या फर्मची प्रमुख वैशिष्ट्ये असतील. आपल्या नावाप्रमाणेच या उद्योगाला उज्ज्वल भविष्य असेल, असा आम्हाला विश्वास आहे. या उद्घाटन सोहळ्यासाठी परिसरातील नागरिक आणि व्यावसायिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.


## जाहीर नोटीस

**तमाम लोकांस विशेषतः अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील नालेगांव भागातील लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,– खालील परिशिष्टात नमुद केलेल्या मिळकती संदर्भात अहमदनगर येथील मा. जिल्हा न्यायालयात उशिर माफीचे अर्जासमवेत नियमित सिव्हील अपील क्र. ४१८/२०२५ चे न्यायप्रविष्ठ आहे. सदरचे अपिल हे श्री. खंडू महादू शेटे यांचे तर्फे ज.मु.धारक श्री. चंद्रकांत किसन जाधव यांनी १) श्री.रविंद्र मदनलाल मुथा, २) कल्पना रविंद्र मुथा, ३) श्रीमती गिताबाई श्रीपत शेटे, ४) श्री. साहेबराव श्रीपत शेटे, ५) बाळू उर्फ बाळासाहेब श्रीपत शेटे, ६) श्रीमती शोभा भिमराज कुटे, ७)श्रीमती मंगल दादाभाऊ भोर, ८) श्रीमती समा उर्फ समाबाई विठ्ठल शेटे, ९) श्रीमती बेबी आसाराम शेटे, १०) श्री.संतोष आसाराम शेटे, ११) श्री. गणेश आसाराम शेटे व १२)श्रीमती संगिता विष्णू म्हस्के यांचे विरुध्द दाखल केलेले आहे. सदर मिळकतीत अपिलकर्त्यांचे कायदेशिर मालकी हक्क, हितसंबंध असून, सदरचे हक्क डावलण्याचे हेतुने वर नमुद इसम मिळकतीची गहाण, दान, विक्री, साठेखत, बक्षीस, लिज, वील, डिड, करार, इत्यादी दस्ताने हस्तांतर करण्याचे विचारात आहेत, तरी सदर मिळकतीबाबत न्यायालयात वाद न्यायप्रविष्ठ असल्याने, सदरच्या मिळकतीबाबत नमुद इसमांबरोबर कोणीही कोणत्याही प्रकारचा गहाण, दान, विक्री. साठेखत, बक्षीस, लिज. डिड, करार, इत्यादी दस्ताने व्यवहार करु नये. याउपरही भविष्यात कोणीही कोणत्याही प्रकारचा व्यवहार केल्यास सदर व्यवहार करणारास मिळकतीबाबत कोणतेही हक्क, हितसंबंध प्राप्त होणार नाहीत अगर मिळकतीचा कब्जाही मिळणार नाही. तसेच सदरचा तथाकथीत व्यवहार तसेच मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही फसगत होवू नये म्हणून ही प्रसिध्द केली आहे. कळावे.**

**–: परिशिष्ट :–**

**मिळकतीचे वर्णन :**– जिल्हा अहिल्यानगर पो.तु.ता.नगर पैकी अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील मौजे नालेगांव येथील मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे–

| सर्व्हे नंबर | क्षेत्र हे आर | चतु:सिमा | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | पुर्व | दक्षिण | पश्चिम | उत्तर |
| १९०/१+२+३/अ | २–२५ | स. नं. १९०/१ +२+३पै | स. नं. १९१ | स. नं. १८९ | ओढा, बोल्हेगांव शिव |
| १९०/१+२+३/ब | २–४१ | स. नं. १९२ | स. न १९१ | स. नं. १९०/१+२+३पै | स. नं. १९०/१+२+३ पै |

येणेप्रमाणे चतु:सिमापूर्वक वर्णनाची मिळकत वागणुकीचे व वहिवाटीचे हक्कासह काहीएक राखून न ठेवता असे.
येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे

अहमदनगर
दि. ११/७/२०२६

**ॲड. क्रांती अशोक बागुल**
पत्ता–एडीसीसी बँकेजवळ, भिंगार, अहिल्यानगर,
मो–९२०९८८५०२०, ९०२८६८२६१२




# अंडाशयाच्या कर्करोगाचं प्रमाण वाढतंय

व्याधी विचार


डॉ. मेघा दळे

ओव्हेरियन (अंडाशय) कर्करोग महिलांच्या अंडाशयात होतो. अंडाशय हे स्त्रियांच्या प्रजनन अवयवांपैकी एक महत्त्वाचा अवयव आहे. अंडाशयात अंडी (स्त्रीबीज) तयार होतात. बरेचदा सुरुवातीच्या टप्प्यात अंडाशयाच्या कर्करोगाचे निदान होत नाही. वांरवार पोट फुगणे, ओटीपोटात वेदना, वारंवार लघवी होणे आणि आतड्यांच्या हालचालींमध्ये बदल ही होणे ही या कर्करोगाची लक्षणे आहेत. वय, कौटुंबिक इतिहास आणि बीआरसीए १ आणि बीआरसीए २ सारख्या अनुवांशिक घटकांमुळे हा कर्करोग होण्याची शक्यता वाढते.

**अनुवांशिकता असल्यास जोखीम अधिक**

काही महिलांमध्ये अनुवांशिकतेने बीआरसीए १ आणि बीआरसीए २ असे घटक आढळतात. त्यांना ओव्हरियन कॅन्सरचा धोका अधिक असतो. हे अनुवांशिक घटक पालकांपैकी एकाकडून संक्रमित होऊ शकतात.

स्तन किंवा अंडाशयाच्या कर्करोगाचा कौटुंबिक इतिहास असलेल्या महिलांनी अनुवांशिक समुपदेशन (जेनेटीक काऊन्सलिंग) सारख्या पर्यायाचा विचार करावा. बीआरसीए सारख्या अनुवांशिक घटकांबरोबरच लिंच सिंड्रोम, कोलन आणि एंडोमेट्रियल कर्करोगाशी संबंधित स्थितीदेखील अंडाशयाच्या कर्करोगाचा धोका वाढवते.




**पन्नास वर्षांवरील महिलांना जादा धोका**

बहुतेक वेळा अंडाशयाच्या कर्करोगाचे निदान ५० वर्षांपेक्षा अधिक वयाच्या महिलांमध्ये होते. वाढत्या वयाबरोबरच या कर्करोगाचा धोका वाढत जातो. ओव्हरियन, स्तन किंवा गर्भाशय मुखाच्या कर्करोगाचा कौटुंबिक इतिहास असल्यास वेळोवेळी तपासण्या करून घ्यायला हव्यात. लवकर निदान झाल्यास वेळेवर उपचार मिळू शकतात आणि रुग्ण बरा होण्याची शक्यता वाढते. दुर्दैवाने अनेक प्रकरणांमध्ये निदानास विलंब होतो.


**कोणत्या चाचण्या कराव्यात?**

अंडाशयाच्या कर्करोगासाठी सध्या कोणतीही प्रभावी चाचणी उपलब्ध नाही. त्यामुळे त्याविषयी जागरूकता अधिक गरजेची आहे. नियमित पेल्विक तपासणी, उच्च-जोखीम प्रकरणांमध्ये अल्ट्रासाऊंड इमेजिंग आणि लक्षणांबाबत जागरूक राहणे वेळीच निदानास मदत करू शकते. कौटुंबिक इतिहास किंवा अनुवांशिक धोका असलेल्या महिलांनी नियमित तपासणी करावी आणि आपल्या डॉक्टरांशी याविषयी वेळोवेळी चर्चा करणे गरजेचे आहे. अधिक धोका असलेल्या महिलांसाठी, ट्रान्सव्हजायनल अल्ट्रासाऊंड आणि सीए-१२५ रक्त चाचण्यांचा सल्ला दिला जातो.

**धोका कमी करण्यासाठी...**

जीवनशैलीत अचूक बदल करणेदेखील या कर्करोगास प्रतिबंध करण्यास फायदेशीर ठरू शकते. वजन नियंत्रित राखणे, धूम्रपान टाळणे आणि शारीरिकदृष्ट्या सक्रिय राहणे यामुळे या कर्करोगाचा धोका कमी होण्यास मदत होऊ शकते. कौटुंबिक इतिहासाबद्दल माहिती असणे आणि लक्षणे समजून घेणे हे त्या महिलांना वेळीच उपचार घेण्यास मदत करतील. म्हणूनच समाजात या कर्करोगाविषयी जागरूकता निर्माण करत अनुवांशिक तपासणी आणि जीवनशैलीत योग्य बदल केल्यास महिलांना कर्करोगाचा धोका कमी करता येतो.

# वारंवारचे झटके गंभीरच!



आरोग्य वेध

मुलांना वारंवार झटके येत असतील तर ते नेहमीच अपस्मार (फेफरे) असतात असे नाही. काही वेळा ते मेंदू किंवा मज्जासंस्थेशी संबंधित दुसऱ्या गंभीर आजाराचे लक्षण असू शकतात. अशा आजारांची सुरुवातीला ओळख करणे कठीण असते, कारण त्यांची लक्षणे अपस्मार, मुलाचा विकास मंदावणे, वागण्यात बदल होणे किंवा लक्ष न लागणे यांसारखी दिसू शकतात.

एखाद्या मुलाला उपचार सुरू असूनही वारंवार झटके येत असतील, त्याचा वयानुसार विकास होत नसेल, शरीरात अनैच्छिक हालचाली होत असतील किंवा आधी शिकलेल्या गोष्टी तो विसरू लागला असेल, तर ही लक्षणे दुर्लक्षित करू नयेत. झटके येण्यामागे अनेक कारणे असू शकतात. उदाहरणार्थ, तीव्र ताप, संसर्ग किंवा शरीरातील इतर काही आजार; पण मुलाला वारंवार झटके येत असतील, तो काही सेकंद शून्यात पाहत राहत असेल, अचानक अंगाला झटके येत असतील, कारण नसताना तो पडत असेल, औषधांचा परिणाम होत नसेल किंवा अगदी लहान वयातच झटके सुरू झाले असतील, तर डॉक्टरांकडून तपासणी करून घ्यावी. अशा काही समस्या मुलाच्या बोलण्यावर, शिकण्यावर, चालण्यावर, झोपेवर, वागणुकीवर आणि एकूणच विकासावर परिणाम करू शकतात. अनेकदा आई-वडिलांना सर्वप्रथम हे जाणवते, की त्यांचे मूल वयानुसार वाढत नाही किंवा त्याचे वागणे इतर मुलांपेक्षा वेगळे आहे.

# कमी झोपेमुळे येऊ शकतो हृदयविकाराचा झटका



आरोग्यविशेष


डॉ. दत्तात्रय मुळे

उत्तम आरोग्य आणि दीर्घयुष्यासाठी झोप अतिशय महत्त्वाची ठरते. वयानुसार प्रत्येकाने आवश्यकतेइतकी झोप घेणे आवश्यक आहे. कामाचा ताण आणि कार्यपद्धतीशिवाय इतर अनेक कारणामुळे अनेकांना रात्री जागरण करण्याची सवय असते. गरज नसतानाही अनेक जण रात्री विनाकारण जागे राहतात. रात्री न झोपणे ही आरोग्यासाठी धोक्याची घंटा आहे. गेल्या काही वर्षांमध्ये कमी वयातही लोकांना हृदयविकाराच्या झटक्याने जीवाला मुकावे लागले. स्वीडनमधील उप्पसला विद्यापीठात केलेल्या एका अभ्यासातून सलग तीन रात्री झोप न घेतल्यास हृदयरोगाचा धोका वाढण्याची शक्यता जास्त असते, असा धक्कादायक गौप्यस्फोट झाला आहे. या संशोधनात निरोगी आणि तरुण लोकांचा विचार करण्यात आला होता. त्यांना कोणत्याही प्रकारच्या हृदयरोगाचा धोका नव्हता, तरीही झोपेच्या कमतरतेमुळे त्यांच्या शरीरात जळजळ आणि हृदयरोगाशी संबंधित बदल दिसून आले.

**तरुणांनी सजग होण्याची आवश्यकता**

आतापर्यंतचे बहुतेक संशोधन मध्यमवयीन किंवा वयस्कर लोकांवर करण्यात आले आहे, पण या अभ्यासातून लहान वयात झोपेचा अभाव हृदयावर परिणाम करतो, असे सिद्ध झाले. म्हणून, तरुणांनी त्यांच्या झोपेबद्दल जागरूक राहणे अतिशय गरजेचे आहे.

# ... हे मेंदू ट्युमरचे लक्षण



व्याधी विकार

आपल्यापैकी अनेकांना कधी ना कधी चक्कर येणे, एखादी गोष्ट विसरणे किंवा चालताना अचानक तोल जाऊन एखाद्या वस्तूला धडक लागणे असे अनुभव येत असतात. बहुतेक वेळा या गोष्टींचे कारण ताणतणाव, थकवा, अपुरी झोप किंवा निष्काळजीपणा असे मानले जाते; मात्र ही लक्षणे वारंवार दिसू लागली किंवा कालांतराने ती अधिक गंभीर होत गेली, तर ती मेंदूतील ट्युमरसारख्या गंभीर आजाराची संकेत असू शकतात.

मेंदूतील ट्युमर म्हणजे मेंदूमध्ये किंवा त्याच्या सभोवतालच्या ऊतींमध्ये असामान्य पेशींची वाढ होणे. अनेकदा डोकेदुखी हे त्याचे प्रमुख लक्षण मानले जाते; परंतु सुरुवातीच्या टप्प्यात काही रुग्णांमध्ये अतिशय सूक्ष्म आणि दुर्लक्षित राहणारी लक्षणे दिसू शकतात. त्यापैकी एक म्हणजे अचानक वाढलेला निष्काळजीपणा किंवा वारंवार होणारी चूक. उदाहरणार्थ, एखाद्या व्यक्तीच्या हातातून वस्तू वारंवार पडणे, चालताना तोल जाणे, अडखळणे किंवा पूर्वी सहज करता येणाऱ्या दैनंदिन कामांमध्ये अडचणी निर्माण होणे अशी लक्षणे दिसू शकतात. ही लक्षणे ट्युमरच्या स्थानानुसार बदलू शकतात. शरीराचा तोल आणि हालचालींचे समन्वय नियंत्रित करणाऱ्या सेरेबेलम भागात ट्युमर असल्यास वारंवार पडणे, समन्वयाचा अभाव किंवा हात-डोळ्यांमधील समन्वय बिघडणे यांसारख्या समस्या उद्भवू शकतात. तसेच हालचालींवर नियंत्रण ठेवणाऱ्या मेंदूच्या भागात ट्युमर असल्यास शरीराच्या एका बाजूला अशक्तपणा किंवा हालचालींमध्ये अडथळा जाणवू शकतो. निष्काळजीपणासोबत इतर काही लक्षणेदेखील दिसू शकतात. यामध्ये सततची डोकेदुखी, मळमळ, उलट्या, धूसर किंवा दुप्पट दिसणे, बोलण्यात अडचण, व्यक्तिमत्त्वातील बदल, स्मरणशक्ती कमी होणे आणि फिट्स (आकडी) येणे यांचा समावेश होतो. काही रुग्णांमध्ये लक्ष केंद्रित करण्यात अडचण येऊ शकते किंवा दैनंदिन कामे करणे कठीण होऊ शकते. मुलांमध्ये विकासाचा वेग मंदावणे, शैक्षणिक कामगिरीत घट किंवा तोल राखण्यात अडचणी निर्माण होऊ शकतात. मेंदूतील ट्युमरचे निदान करणे अनेकदा आव्हानात्मक ठरते, कारण तो हळूहळू वाढत असल्याने त्याची लक्षणे कालांतराने दिसू लागतात. अनेकजण ही लक्षणे वाढते वय, ताणतणाव, मायग्रेन किंवा जीवनशैलीशी संबंधित समस्या म्हणून दुर्लक्षित करतात.

परिणामी, अनेक वेळा लक्षणे गंभीर झाल्यानंतरच निदान होते; पण हे लक्षात ठेवणे गरजेचे आहे, की प्रत्येक वेळी अडखळणे किंवा तोल जाणे म्हणजे मेंदूतील ट्युमर असे नाही. मज्जासंस्था, अंतर्गत कान, चयापचय प्रक्रिया किंवा स्नायू-सांध्यांशी संबंधित अनेक आजारांमध्येही अशी लक्षणे दिसू शकतात.


# उच्च रक्तदाबावर नियंत्रण हवे

जीवनशैली

उच्च रक्तदाब (हाय ब्लड प्रेशर) हा आजच्या धावपळीच्या जीवनशैलीत वेगाने वाढणारा आरोग्यविषयक धोका बनला आहे. जागतिक स्तरावर लाखो लोक या समस्येने ग्रस्त आहेत आणि त्याचे प्रमाण भारतातही सातत्याने वाढत आहे. वैद्यकीय तज्ज्ञांच्या मते, उच्च रक्तदाबाला 'सायलेंट किलर' म्हटले जाते. कारण सुरुवातीच्या टप्प्यात त्याची स्पष्ट लक्षणे दिसून येत नाहीत; मात्र योग्य वेळी नियंत्रण न ठेवल्यास हृदयविकार, स्ट्रोक, मूत्रपिंडाचे आजार आणि इतर गंभीर आरोग्यसमस्या निर्माण होऊ शकतात.

आरोग्यतज्ज्ञांच्या मते औषधोपचारांसोबतच जीवनशैलीतील काही महत्त्वाचे बदल केल्यास रक्तदाब प्रभावीपणे नियंत्रित ठेवता येतो आणि दीर्घकालीन आरोग्य लाभ मिळू शकतात. उच्च रक्तदाब नियंत्रणात ठेवण्यासाठी सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे संतुलित आणि पौष्टिक आहार. डॉक्टरांच्या मते, आहारात फळे, भाज्या, संपूर्ण धान्ये, डाळी आणि कमी चरबीयुक्त पदार्थांचा समावेश केल्यास रक्तदाब कमी करण्यास मदत होते. विशेषतः पोटॅशियमयुक्त अन्नपदार्थ शरीरातील सोडियमचे प्रमाण संतुलित ठेवण्यास मदत करतात. केळी, संत्री, पालक, टोमॅटो आणि काकडी यांसारख्या पदार्थांचे सेवन फायदेशीर ठरते. त्याचबरोबर प्रक्रिया केलेले अन्न, जंक फूड आणि जास्त तेलकट पदार्थ टाळणे आवश्यक आहे. योग्य आहार केवळ रक्तदाब नियंत्रणात ठेवत नाही, तर संपूर्ण हृदयविकाराचा धोका कमी करण्यासही मदत करतो. मीठाचे प्रमाण कमी करणे हे उच्च रक्तदाब व्यवस्थापनातील अत्यंत महत्त्वाचे पाऊल मानले जाते. अनेक संशोधनांमधून असे दिसून आले आहे, की जास्त सोडियमचे सेवन केल्याने रक्तदाब वाढण्याचा धोका अधिक असतो. तज्ज्ञांच्या मते, दररोज आवश्यकतेपेक्षा जास्त मीठ खाल्ल्यास रक्तवाहिन्यांवर अतिरिक्त ताण निर्माण होतो. त्यामुळे स्वयंपाकात कमी मीठ वापरणे, पॅकेज्ड खाद्यपदार्थांचे सेवन मर्यादित ठेवणे आणि चिप्स, नमकीन तसेच प्रक्रिया केलेल्या पदार्थांपासून दूर राहणे आवश्यक आहे. मीठाचे सेवन नियंत्रित ठेवल्यास काही आठवड्यांतच रक्तदाबात सकारात्मक बदल दिसून येऊ शकतात. नियमित शारीरिक व्यायाम हा उच्च रक्तदाब कमी करण्यासाठी सर्वात प्रभावी आणि नैसर्गिक उपायांपैकी एक मानला जातो.

आरोग्य तज्ज्ञांच्या मते, दररोज किमान ३० ते ४५ मिनिटे चालणे, सायकलिंग करणे, पोहणे किंवा हलका व्यायाम करणे रक्ताभिसरण सुधारण्यास मदत करते. नियमित व्यायामामुळे हृदय अधिक कार्यक्षम बनते आणि रक्त पंप करण्यासाठी त्याला कमी मेहनत घ्यावी लागते. परिणामी रक्तवाहिन्यांवरील दाब कमी होतो. याशिवाय व्यायामामुळे वजन नियंत्रणात राहते, तणाव कमी होतो आणि मानसिक आरोग्य सुधारते. शरीराचे वाढते वजन हे उच्च रक्तदाबाचे एक प्रमुख कारण मानले जाते.



# मानसिक थकव्याने नैराश्य?



मानसोपचार

आजच्या आधुनिक आणि वेगवान आयुष्यात शारीरिक आरोग्याइतकीच मानसिक आरोग्याची काळजी घेणे गरजेचे बनले आहे; मात्र सध्या अनेक लोकांना शारीरिक थकव्यापेक्षा मानसिक थकवा जास्त सतावताना दिसत आहे. सततचा कामाचा ताण, कौटुंबिक जबाबदाऱ्यांचे ओझे, आर्थिक चिंता आणि 'सोशल मीडिया'चा वाढता प्रभाव यामुळे अनेक जण मानसिकरित्या खचून जात आहेत. धक्कादायक बाब म्हणजे, आपण मानसिक थकव्याचे शिकार झालो आहोत, हे अनेकांच्या लक्षातच येत नाही. तज्ज्ञांच्या मते, हा थकवा वेळीच ओळखला नाही, तर त्याचे रूपांतर गंभीर नैराश्यात होऊ शकते. मेंदू आणि मनाची थकलेली अवस्था ओळखण्यासाठी काही ठळक लक्षणे मदत करू शकतात.

**लक्षणे** - ७-८ तासांच्या झोपेनंतरही थकवा कायम: अनेकदा रात्री पुरेशी म्हणजे ७ ते ८ तासांची झोप घेऊनही सकाळी उठल्यावर व्यक्तीला ताजेतवाने वाटत नाही. शरीर आणि मन सकाळीही तणावग्रस्त असते.

# केशराच्या पाण्याचे लाभ


आयुर्वेद आणि विकार



केशरमुळे पदार्थाला छान रंग येतो. केशराचा सुगंधही मन मोहवून टाकतो. केशर घातल्यामुळे मिष्ठान्नाला वेगळीच चव येते. केशरामुळे पदार्थाची लज्जतच वाढते असं नाही तर केशर खूप गुणकारीही आहे. आपला मूड लगेच चांगला होतो. कॅन्सरच्या पेशी मारण्याची क्षमताही केशरात असते. केशरामुळे शरीराचा दाह कमी होतो. इतकंच नाही तर केशरात अँटीऑक्सिडंट्ही असतात. केशराचं पाणी विविध आजारांवर गुणकारी ठरू शकतं. अर्थात केशरयुक्त पाणी पिण्याआधी डॉक्टरांचा सल्ला घेणं योग्य ठरतं. केशरयुक्त पाणी प्यायल्यामुळे चेहऱ्यावर छान चमक येते. केसांचं आरोग्य राखण्यासाठीही केशराचं पाणी प्यायला हवं. महिलांना मासिकपाळी दरम्यान बराच त्रास होतो. केशरामधल्या काही घटकांमुळे अस्थमा, कफ, घसा खवखवणं, मळमळणं, उलट्या अशा विविध विकारांवर केशर खूपच प्रभावी ठरतं. केशरयुक्त पाणी प्यायल्याने बरेच लाभ मिळू शकतात. केशराच्या सहा ते सात कांड्या दहा मिनिटं गरम पाण्यात भिजवून ठेवा. हे पाणी नियमितपणे प्या. सकाळी रिकाम्या पोटी हे पाणी प्यायला हवं.

# फुफ्फुस आणि हिमोग्लोबिनचा संबंध

जाणून घ्या




श्वास घेण्यास त्रास होणे किंवा दम लागणे यासाठी नेहमीच फुफ्फुसांचे आजार कारणीभूत नसतात. रक्तातील हिमोग्लोबिनचे प्रमाण कमी-जास्त झाल्यासही थकवा आणि धाप लागण्याची समस्या उद्भवू शकते. त्यामुळे अशा लक्षणांकडे दुर्लक्ष न करता फुफ्फुसांच्या तपासणीसोबतच रक्ताची चाचणी करणेही आवश्यक असल्याचे मत फुफ्फुसविकारतज्ज्ञांनी व्यक्त केले आहे.

शरीराला पुरेशा प्रमाणात ऑक्सिजन मिळण्यासाठी फुफ्फुसे आणि रक्त या दोन्हींचे आरोग्य चांगले असणे आवश्यक असते. हिमोग्लोबिनची पातळी कमी झाल्यास अशक्तपणा येतो. अशावेळी फुफ्फुसे सामान्यपणे कार्यरत असतानाही शरीराच्या उतींना पुरेसा ऑक्सिजन मिळत नाही. परिणामी, शारीरिक हालचालींदरम्यान धाप लागणे, लवकर थकवा येणे, जलद श्वास घेणे आणि सहनशक्ती कमी होणे अशी लक्षणे दिसून येतात.

नवसंशोधन

## सोशल मीडिया ठरतो घातक!



सध्या मुलांमध्ये स्मार्टफोन, सोशल मीडिया यांच्या वापराचं प्रमाण प्रचंड वाढलं आहे. बरीच मुलं तासनतास मोबाईल वापरताना दिसतात. मात्र सोशल मीडियाचा अतिवापर मुलांच्या सर्वांगिण विकासासाठी मारक ठरू शकतो, असं एका संशोधनातून समोर आलं आहे. सोशल मीडियामुळे वाढत्या वयाच्या तसंच किशोरवयीन मुलांमध्ये खाण्याशी संबंधित विकार बळावण्याची शक्यता असते, असा इशारा शास्त्रज्ञांनी दिला आहे. त्यामुळे पालकांनी आपल्या मुलांच्या मोबाईल वापरावर नियंत्रण ठेवणं गरजेचं आहे. इंटरनॅशनल जर्नल ऑफ इटिंग डिसऑर्डर्स या जर्नलमध्ये हे संशोधन प्रकाशित झालं आहे. सध्या सोशल मीडियाची बरीच व्यासपीठं आहेत. मुलांची बरीच खाती असतात. मात्र एकापेक्षा अधिक सोशल मीडिया व्यासपीठांचा वापर लहानग्यांचं आरोग्य बिघडवू शकतो.

दंतारोग्य

## जास्त वेळ दात घासू नका!



बरेचजण बाल्कनीत उभं राहून किंवा फिरत फिरत दात घासतात. त्यांचं दात घासणं अर्धा-पाऊण तास सुरू असतं. मात्र अशा पद्धतीने दात घासणं अयोग्य आहे. अधिक काळ दात घासल्याने कोणतेही लाभ होत नाहीत. दातांवर जोरजोरात ब्रश घासल्यामुळे एनामेलचा थर कमी होत जातो. हिरड्या मागच्या बाजूला सरकरतात. यामुळे दंतविकार डोकं वर काढू शकतात. उगाचच दात घासत बसल्यामुळे खर्चिक उपचार करून घेण्याची वेळ येऊ शकते. १० ते २० टक्के प्रौढांचे दात याच कारणामुळे खराब होतात. म्हणूनच अधिक काळ दात घासण्याचा मोह टाळावा. दोन ते तीन मिनिटं दात घासणं पुरेसं असतं. उगाचच अर्धा तास दात घासत बसण्यात काहीच अर्थ नसतो हे लक्षात ठेवा.

केसांचं आरोग्य

## झिंक ठरतं प्रभावी




केस गळणं ही सर्वसाधारण समस्या बनून गेली आहे. महिलांसह पुरुषही केसगळतीने त्रस्त आहेत. केस गळण्यामागे बरीच कारणं असतात. अपुरी झोप, प्रदूषण, पोषक आहाराचा अभाव अशा असंख्य कारणांमुळे केस गळू लागतात. केसांच्या वाढीसाठी बऱ्याच पोषक घटकांची गरज असते. झिंक हा त्यापैकी एक पोषक घटक आहे. झिंकमुळे केसांचे टिश्यू बळकट होतात आणि वेगाने वाढ होऊ लागते. केसांच्या टिश्यूंचं नुकसान झिंकमुळे भरून निघतं. त्यामुळे केसांच्या वृद्धीसाठी आहारात झिंकचा समावेश असायला हवा. जवस, सुका मेवा, पूर्णधान्य, अंडी, दुग्धजन्य पदार्थ, डार्क चॉकलेट यामधून झिंक मिळू शकतं.

आजीबाईचा बटवा

## उपयोग मेथीचे



थंडीच्या दिवसात मेथी खायला हवी. मेथीच्या पानांमध्ये तंतूमय पदार्थ आणि भरपूर पोषक घटक असतात. थंडीत बरेचजण वजन कमी करतात. मेथीमध्ये खूप कमी कॅलरी असल्यामुळे आहारात मेथीचा समावेश करता येईल. मेथीच्या सेवनामुळे कोलेस्टरॉलचं प्रमाण कमी व्हायला मदत होते. कोलेस्टरॉल हृदयासाठी खूपच घातक असतं. मधुमेहींनी मेथीचं सेवन करायला हवं. मेथीमुळे रक्तातल्या शर्करेचं प्रमाण नियंत्रणात राहतं. मेथीमध्ये अँटीऑक्सिडंट्स तसंच बरीच जीवनसत्त्वं असतात. यामुळे त्वचेचं आरोग्य सुधारतं. या दिवसात त्वचा कोरडी पडते, फुटते. पण मेथीमुळे त्वचेचा तजेला टिकून रहायला मदत होते. मेथीमुळे पचनशक्ती सुधारते. पचनाच्या तक्रारी असतील तर मेथी खाता येईल. मेथीमधल्या फायबरमुळे अन्नपचन सुलभतेने होतं. त्यामुळे पचनाच्या तक्रारी असणाऱ्यांनी मेथीचं सेवन करायला हवं.

## नवीन आपले सरकार केंद्र आयडी प्रदान करण्यासाठी १७ जुलैपर्यंत ऑनलाईन अर्ज सादर करावेत

नगर – जिल्ह्यातील ग्रामपंचायत, नगरपंचायत, नगरपरिषद व महानगरपालिका क्षेत्रात नवीन आपले सरकार सेवा केंद्र आयडी प्रदान करण्यासाठी ऑनलाइन अर्ज मागविण्यात आले होते. परंतू ८८ ग्रामपंचायतींमध्ये एकही ऑनलाइन अर्ज प्राप्त झाला नाही, त्या ग्राम पंचायतींतील रिक्त जागांसाठी १७ जुलै रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंत ऑनलाइन अर्ज सादर करण्याचे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा सेतू समितीचे सदस्य सचिव दादासाहेब गिते यांनी केले आहे.

या रिक्त जागांसाठी ८ ते १७ जुलै या कालावधीत https://ahilyanagaraaplesarkar.com या संकेतस्थळावर पात्र व्यक्तींनी अर्ज सादर करावेत. अर्जासाठीच्या अटी व शर्ती पूर्वी प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहिरातीनुसारच लागू राहतील.

रिक्त ग्रामपंचायतींमध्ये अहिल्यानगर तालुक्यात ४, अकोले ३३, जामखेड ६, कर्जत २, कोपरगाव ४, नेवासा २, पारनेर ७, पाथर्डी ६, राहुरी ५, संगमनेर १५, शेवगाव २, श्रीगोंदा १ तर श्रीराम पूर तालुक्यात २ अशा एकूण ८८ ग्रामपंचायतींचा समावेश आहे. रिक्त ८८ ग्रामपंचायतींची नावे https://ahilyanagar.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असल्याचेही कळविण्यात आले आहे.

## प्रधानमंत्री मातृत्व योजनेअंतर्गत ९० गर्भवती महिलांची आरोग्य तपासणी



### गरोदरपणात नियमित आरोग्य तपासणी अत्यावश्यक : डॉ. अमोल जाधव

नगर – प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व योजनेअंतर्गत प्रत्येक महिन्याच्या ९ तारखेला गर्भवती महिलांसाठी विशेष आरोग्य तपासणी मोहीम राबविण्यात येते. या उपक्रमांतर्गत सरस्वती सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलतर्फे स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. अमोल जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली नगर तालुक्यातील बुऱ्हाणनगर येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात गर्भवती महिलांची आरोग्य तपासणी व समुपदेशन करण्यात आले. या शिबिरात सुमारे ९० गर्भवती महिलांची तपासणी करण्यात आली.

या शिबिरासाठी वैद्यकीय अधिकारी डॉ. हरिभाऊ गाढे, डॉ. सुमय्या पठाण, डॉ. वैष्णवी गोपाळघरे, पल्लवी सुरांडकर, आर. आर. गायकवाड आणि एन. एस. पतंगे आदी उपस्थित होते.

तपासणीदरम्यान डॉ. अमोल जाधव यांनी उच्च जोखमीच्या गर्भधारणेची लक्षणे ओळखणे, रक्तदाबातील चढ–उतार, रक्तातील हिमोग्लोबिनचे प्रमाण कमी असणे, मधुमेह, सूज, गर्भातील बाळाची वाढ कमी होणे किंवा गर्भजलाचे प्रमाण कमी असणे अशा विविध समस्यांचे निदान करून आवश्यक उपचार व मार्गदर्शन केले. तसेच सुरक्षित आणि नैसर्गिक प्रसूतीसाठी आवश्यक आहार, नियमित व्यायाम, योग्य जीवनशैली आणि घ्यावयाची काळजी याबाबत महिलांचे समुपदेशन करण्यात आले.

डॉ. जाधव म्हणाले, गर्भवती महिलांनी नियमित आरोग्य तपासणी करून आई आणि बाळाच्या आरोग्याकडे विशेष लक्ष द्यावे. सध्या सोशल मीडियावर आरोग्यविषयक विविध रिल्स आणि माहिती मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असते. मात्र प्रत्येक माहिती सर्वांसाठी योग्य असेलच असे नाही. चुकीची किंवा अपुरी माहिती पाहून भीती बाळगू नये किंवा अनावश्यक गुंतागुंतीची चिंता करू नये. कोणतीही शंका असल्यास तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घेणे अधिक महत्त्वाचे आहे. सरस्वती सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलच्या नऊ वर्षांच्या वाटचालीत डॉ. अमोल जाधव यांनी सामाजिक बांधिलकी जपत शासनाच्या विविध आरोग्य योजनांद्वारे महिला आरोग्य जनजागृतीचे कार्य सातत्याने केले आहे. शहरी तसेच ग्रामीण भागात विविध आरोग्य शिबिरांद्वारे महिलांना आरोग्यविषयक मार्गदर्शन करण्यात आले आहे. गर्भधारणेपासून प्रसूतीपर्यंतचा नऊ महिन्यांचा प्रवास सुरक्षित, निरोगी आणि आनंददायी व्हावा, यासाठी सरस्वती सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. गर्भातील बाळाच्या आरोग्याचे अचूक परीक्षण करण्यासाठी अत्याधुनिक सोनोग्राफी मशीन कार्यान्वित करण्यात आले असून, आंतरराष्ट्रीय दर्जाचे मॉड्युलर ऑपरेशन थिएटरही उपलब्ध आहे, असे त्यांनी सांगितले.

## प्रत्यक्ष अनुभवातून विद्यार्थ्यांनी घेतला मातीकलेचा आनंद

### सेंट विवेकानंद प्रायमरी स्कूलमध्ये पॉटरी शो उत्साहात



मातीपासून वस्तू तयार करण्याचा आनंद घेताना विद्यार्थिनी.

नगर – राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि सुधारित अभ्यासक्रमातील मातीकाम या घटकाशी सुसंगत अनुभवाधारित शिक्षण देण्याच्या उद्देशाने सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूलच्या प्राथमिक विभागात इयत्ता तिसरी, चौथी व पाचवीच्या विद्यार्थ्यांसाठी पॉटरी शो या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. मुख्याध्यापिका कांचन पापडेजा यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या उपक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

यावेळी कुंभार कलाकार नाथा देवतरसे यांनी चाकावर मातीपासून विविध आकर्षक कलाकृती साकारत मातीकामाचे थेट प्रात्यक्षिक सादर केले. विद्यार्थ्यांनी मातीच्या वस्तू तयार करण्याची संपूर्ण प्रक्रिया जवळून अनुभवली. यामुळे मातीकामातील कौशल्य, संयम, सर्जनशीलता तसेच भारतीय पारंपरिक कलेचे महत्त्व विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष समजले.

मुख्याध्यापिका कांचन पापडेजा यांनी सांगितले की, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार विद्यार्थ्यांना अनुभवाधारित शिक्षण देणे ही काळाची गरज आहे. माती कामासारख्या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांची सर्जनशीलता, कल्पनाशक्ती, निरीक्षणशक्ती आणि हस्तकौशल्य विकसित होते. तसेच अशा उपक्रमांतून पारंपरिक कलांविषयी आदर आणि संवर्धनाची भावना विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होते.

या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष राम मेंघानी, उपाध्यक्ष रूपचंद मोटवानी, सचिव गोपाल भागवानी, खजिनदार दामोधर माखिजा, विश्वस्त सुरेश हिरानंदानी, महेश मध्यान, हरेष मध्यान, राजकुमार गुरुनानी, प्राचार्या गीता तांबे तसेच मुख्याध्यापिका कांचन पापडेजा यांनी या अभिनव उपक्रमाचे कौतुक केले. विद्यार्थ्यांना अनुभवाधारित शिक्षणाबरोबरच पारंपरिक कलांची ओळख करून देणारे असे उपक्रम सातत्याने राबविण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

कार्यक्रमासाठी प्रियंका चारगुंडी, अनामिका म्हस्के, भावना भालेराव, शुभांगी पाखरे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.



अहिल्यानगर चार्टर्ड अकाऊटंटस शाखेच्या वतीने संस्थेच्या मध्यवर्ती शाखेचा ७८ वा वर्धापनदिन विविध कार्यक्रमांनी साजरा करण्यात आला.

## विविध कार्यक्रमांनी सीए शाखेचा वर्धापनदिन साजरा

नगर – अहिल्यानगर चार्टर्ड अकाऊटंटस शाखेच्या वतीने संस्थेच्या मध्यवर्ती शाखेचा ७८ वा वर्धापनदिन विविध कार्यक्रमांनी साजरा करण्यात आला. नगर शाखेचे अध्यक्ष सीए अभयकुमार कटारिया यांच्या हस्ते संस्थेच्या कार्यालयात ध्वजारोहण करण्यात आले.

शाखा अध्यक्ष सीए अभयकुमार कटारिया म्हणाले, देशाच्या आर्थिक व्यवस्थेला सक्षम आणि पारदर्शक बनविण्यात चार्टर्ड अकाउंटंट्सची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. उद्योग, व्यापार, करव्यवस्था, वित्तीय शिस्त, लेखापरीक्षण, कॉर्पोरेट गव्हर्नन्स आणि आर्थिक सल्लागार म्हणून सीए व्यावसायिकांनी समाजात विश्वासार्ह स्थान निर्माण केले आहे. तसेच अहिल्यानगर शाखा केवळ व्यावसायिक प्रशिक्षणापुरती मर्यादित नसून सामाजिक उत्तरदायित्वही प्रभावीपणे पार पाडत आहे.

वर्धापनदिनानिमित्त रक्तदान शिबिर तसेच इतर उपक्रम आयोजित करण्यात आले होते. अध्यक्ष सीए अभयकुमार कटारिया यांच्या हस्ते या उपक्रमांचे उद्घाटन झाले. यावेळी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचेसुद्धा उद्घाटन करण्यात आले. सुरभी हॉस्पिटलतर्फे ही आरोग्य तपासणी करण्यात आली. दरवर्षीप्रमाणे या वर्षीही रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळेस जनकल्याण रक्तपेढी आणि आनंदऋषिजी रक्तपेढी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रक्तदान शिबिरात पिशव्यांचे संकलन करण्यात आले.

सीए दिनानिमित्त पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून उपमहापौर धनंजय जाधव, माजी महापौर भगवान फुलसौंदर, नगरसेवक गणेश भोसले, नगरसेवक प्रकाश भागानगरे, संजय चोपडा आदींच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी पर्यावरण संरक्षणासाठी प्रत्येकाने किमान एक वृक्ष लावून त्याचे संवर्धन करण्याचा संकल्प करण्यात आला. तसेच स्वच्छता अभियान राबविण्यात आले. शाखा परिसर तसेच शहरातील काही निवडक ठिकाणी सभासदांनी वृक्षारोपण करत पर्यावरण रक्षणाचा संदेश दिला. तसेच समाजप्रबोधनासाठी एक पदयात्रा तिरंगा फाऊंडेशन सोबत आयोजित करण्यात आली. ही यात्रा सीए – राष्ट्रनिर्मितीचे आधार हा संदेश देत जनतेचे लक्ष वेधत होती. त्यालासुद्धा सीए सभासद आणि विद्यार्थी यांचा भरघोस प्रतिसाद मिळाला

सीए काजल चंदे यांनी सूत्रसंचलन केले. सीए महेश तिवारी यांनी आभार मानले. कार्यक्रमास नगर सीए शाखेचे माजी अध्यक्ष, सीए सभासद, विद्यार्थी आणि नागरिकांनी सहभाग घेतला.

कार्यक्रमासाठी नगर सीए शाखेच्या विद्यमान कार्यकारिणीचे सदस्य सीए महेश तिवारी, महेश भळगट, सीए सुनंदा रच्चा, सीए काजल चंदे, सीए प्रसाद पुराणिक यांनी परिश्रम घेतले.

## जागतिक युवा कौशल्य दिनानिमित्त १५ जुलैला ‘पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा’

नगर – जागतिक युवा कौशल्य दिनानिमित्त जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मॉडेल करिअर सेंटर आणि कै. माणिकराव नरसिंगराव पाटील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय), अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

हा मेळावा १५ जुलै रोजी सकाळी १० ते दुपारी ३ या वेळेत कै. माणिकराव नरसिंगराव पाटील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, बुरुडगाव रोड, अहिल्यानगर येथे भरविण्यात येणार आहे. या मेळाव्यात अहिल्यानगर, पुणे आणि छत्रपती संभाजीनगर येथील सुमारे १० ते १५ नामांकित कंपन्या सहभागी होणार असून, त्या थेट मुलाखतीद्वारे पात्र उमेदवारांची निवड करणार आहेत. ऑटोमोबाईलसह विविध क्षेत्रांमध्ये रोजगाराच्या संधी या माध्यमातून उपलब्ध होणार आहेत.

एसएससी, एचएससी, आयटीआय, तसेच सर्व शाखांतील पदवीधर (बी.ए., बी.कॉम., बी.एससी., अभियांत्रिकी) आणि पदविकाधारक (डिप्लोमा) उमेदवार या मेळाव्यासाठी पात्र आहेत. इच्छुक उमेदवारांनी रोजगाराच्या या सुवर्णसंधीचा लाभ घेण्यासाठी त्वरित नोंदणी करावी.

उमेदवारांनी rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर किंवा गुगल फॉर्मद्वारे आपली नोंदणी करावी. अधिक माहितीसाठी कार्यालयीन वेळेत ०२४१–२९९५७३५ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहनही श्री. उगले यांनी केले आहे.

## पार्किंगमधून दुचाकीची चोरी; गुन्हा दाखल

नगर – शहरातील हुंडेकरी लॉन्सच्या पार्किंगमधून एका मजुराची दुचाकी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस चोरट्याचा शोध घेत आहेत.

याबाबत ऋषीकेश वसंत मगर (वय २८, रा. कर्जुन खारे, ता. नगर) यांनी फिर्याद दिली आहे. त्यांनी त्यांची दुचाकी (क्र.’एमएच १६ एएस ४३६७) ही हुंडेकरी लॉन्सच्या पार्किंगमध्ये पार्क केली होती. ४ जुलै रोजी सायंकाळी ६ वाजेपासून ते ७ जुलै रोजी रात्री ९.४५ वाजेच्या दरम्यान अज्ञात चोरट्याने या पार्किंगमधून ही दुचाकी चोरून नेली. दुचाकी जागेवर न दिसल्याने ऋषीकेश मगर यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात तक्रार दिली.त्यावरून पोलिसांनी चोरीचा गुन्हा नोंदवला असून पुढील तपास पो. कॉ. घूंगासे करत आहेत.




न्यू आर्ट्‌स महाविद्यालयात आयोजित इंडक्शन प्रोग्राममध्ये बोलताना जिल्हा मराठा विद्या प्रसारक संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे. व्यासपीठावर मुकेश मुळे, दीपलक्ष्मी मसे–पाटील, प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे, क्षितीज गुंड आदी.

## नोकरीच्या मागे न धावता उद्योजक बना

### रामचंद्र दरे यांचे विद्यार्थ्यांना आवाहन

नगर – आजच्या स्पर्धात्मक युगात केवळ पदवी मिळवून चालणार नाही, तर विद्यार्थ्यांकडे प्रत्यक्ष कौशल्य असणे अनिवार्य आहे. ज्यांच्याकडे उत्तम कौशल्य आहे, त्यांच्यासाठी रोजगाराच्या आणि व्यवसायाच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांनी केवळ नोकरीच्या मागे न धावता कौशल्य आत्मसात करून जॉब क्रिएटर (उद्योजक) बनावे, असे आवाहन अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे यांनी केले.

येथील न्यू आर्टस्, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स महाविद्यालयाच्या सेंटर फॉर अ‍ॅडव्हान्स स्टडीज इन अप्लाइड सायन्सेस विभागाच्या वतीने आयोजित इंडक्शन प्रोग्राममध्ये अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर संस्थेचे सहसचिव मुकेश मुळे, खजिनदार दीपलक्ष्मी मसे–पाटील, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे आणि सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे अधिकारी क्षितीज गुंड उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे यांनी डेटा सायन्स, क्लाउड कॉम्प्युटिंग आणि कॉम्प्युटर सायन्स या अभ्यासक्रमांचे महत्त्व विशद केले. ते म्हणाले की, आजच्या डिजिटल युगात आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) हे केवळ तंत्रज्ञान नसून मानवी जीवन सुसह्य बनवणारे साधन आहे. कृषी, आरोग्य आणि शिक्षण यांसारख्या क्षेत्रांत एआय क्रांती घडवत आहे. विद्यार्थ्यांनी या तंत्रज्ञानाचा वापर केवळ विधायक आणि सकारात्मक कामांसाठीच करावा.

विभाग प्रमुख प्रा. अरुण गांगर्डे यांनी विभागाच्या वाटचालीची माहिती दिली. विभागात उपलब्ध असलेले अत्याधुनिक इन्फ्रास्ट्रक्चर आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाशी सुसंगत अभ्यासक्रमांची माहिती त्यांनी दिली.

येत्या पाच वर्षांत विभागाला जागतिक दर्जाचे बनवण्यासाठी तयार करण्यात आलेल्या व्हिजन २०३० या आराखड्याची रूपरेषा त्यांनी उपस्थितांसमोर मांडली. सूत्रसंचालन प्रा. मंजिरी कारखिले यांनी केले. आभार प्रा. एम. बी. गोबरे यांनी मानले. या इंडक्शन प्रोग्रामला विद्यार्थी आणि पालक उपस्थित होते.

## ‘अभाविप’ आयोजित छात्र गर्जना; गुणवंत विद्यार्थी सत्कार कार्यक्रम उत्साहात




अखिल भारतीय विद्यार्थी परिषद दक्षिण अहिल्यानगर जिल्ह्याच्या वतीने आयोजित विद्यार्थी परिषद.

नगर – अखिल भारतीय विद्यार्थी परिषद दक्षिण अहिल्यानगर जिल्ह्याच्या वतीने ९ जुलै रोजी विद्यार्थी परिषद स्थापना दिवस व राष्ट्रीय विद्यार्थी दिवसाचे औचित्य साधून छात्र गर्जना – भव्य गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा व महानगर कार्यकारिणी घोषणा या कार्यक्रमाचे आयोजन माऊली सभागृह, झोपडी कँटीन येथे करण्यात आले. या कार्यक्रमामध्ये अहिल्यानगर जिल्ह्यातील १० वी व १२ वी बोर्ड परीक्षेत प्राविण्य मिळवेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला. यावेळी ५०० हून अधिक विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र व भारत मातेची प्रतिमा देऊन सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून अभाविप राष्ट्रीय मंत्री श्रवण बी. राज जी, उद्योजक श्रीहरी टिपुगडे, प्रहार अ‍ॅकॅडेमीचे अविनाश खिलारे तसेच अभाविप पश्चिम महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष व जिल्हा प्रमुख प्रा. मिलिंद देशपांडे व जिल्हा संयोजक रोहन भुजबळ उपस्थित होते.

यावेळी राष्ट्रीय मंत्री श्रवण जी यांनी विद्यार्थी परिषदेचा ७८ वर्षांचा प्रवास विद्यार्थ्यांना सांगितला.

उद्योजक श्रीहरी टिपुगडे यांनी विद्यार्थ्यांना व्यावसायिकतेकडे वळण्याचे आवाहन केले.

तसेच प्रहार अ‍ॅकॅडेमीचे अविनाश खिलारे यांनी करियर विषयात मार्गदर्शन केले.

तसेच या कार्यक्रमाच्या सुरुवातीला या शैक्षणिक वर्ष २०२६–२७ ची अहिल्यानगर महानगर कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली. दरवर्षी शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीस ही कार्यकारिणी घोषित करण्यात येते. यावेळी महानगर अध्यक्ष म्हणून प्रा. प्रमोद तांबे व महानगर मंत्री उत्कर्ष परदेशी यांची घोषणा करण्यात आली. यावेळी सर्व विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला व कार्यक्रम उत्साहाने पार पडला.

## ‘अरिहंत फार्मसीला’ ‘व्हेरी गुड’ श्रेणी प्रदान

नगर – महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांच्या शैक्षणिक वर्ष २०२५–२६ च्या शैक्षणिक कार्याच्या मूल्यमापनामध्ये अरिहंत कॉलेज ऑफ फार्मसी, केडगाव, अहिल्यानगर या संस्थेला ‘व्हेरी गुड’ (Very Good) श्रेणी प्रदान करण्यात आली आहे.

संस्थेचे प्राचार्य डॉ. योगेश बाफना यांच्या कुशल नेतृत्वाखाली महाविद्यालयाने शैक्षणिक गुणवत्ता, अध्यापनातील सातत्य, विद्यार्थी विकास आणि संस्थात्मक प्रगती यामध्ये उल्लेखनीय कामगिरी केली आहे. या यशामागे महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे योगदान आहे.

या यशासाठी प्रा. माधुरी पवार, प्रा. वृशाली गायकवाड, प्रा. शितल खंडागळे, प्रा. रुचिता पवार, शिक्षकेतर कर्मचारीवर्ग यांनी केलेल्या समर्पित कार्याचे कौतुक करण्यात आले.

## बालक मंदिर महिला मंडळ शाळेत पालक सभा उत्साहात



नगर – येथील बालक मंदिर महिला मंडळ शाळेमध्ये नुकतेच पालकसभेचे आयोजन करण्यात आले. या सभेत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसह त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शालेय उपक्रम आणि पालकांचा सहभाग या विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. सभेच्या अध्यक्षस्थानी महिला मंडळ संस्थेच्या अध्यक्षा ज्योतीताई केसकर होत्या. प्रमुख पाहुण्या म्हणून छायाताई राजपूत उपस्थित होत्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना मुख्याध्यापिका अस्मिता शूळ म्हणाल्या, विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी जलसाक्षरता, पर्यावरण साक्षरता, अर्थसाक्षरता, व्यवहारज्ञान आणि मूल्य संवर्धन अशा सर्वच बाबींचे ज्ञान शालेय जीवनापासून देणे गरजेचे आहे. शाळेची प्रगती ही पालकांची साथ, विद्यार्थ्यांचे प्रयत्न आणि शिक्षकांच्या मेहनतीवर अवलंबून असते.

सभेत ठकुबाई पवार यांनी प्रज्ञाशोध, स्कॉलरशिप व विविध स्पर्धापरीक्षांची माहिती दिली.

सीमा कवाष्टे यांनी शाळेतील स्वच्छता व नियमांचे महत्त्व विषद केले.

सुकन्या बोल्ली यांनी अद्ययावत शालेय डॉक्युमेंटेशन विषयी माहिती सांगितली.

वैशाली सातपुते यांनी शालेय शिस्त, मूल्यशिक्षण याविषयी माहिती सांगितली.

प्रमुख पाहुण्या छायाताई राजपूत यांनी एक मूल, एक झाड हा मोलाचा संदेश देत पालकत्वाचे कर्तव्य कसे जपावे, यावर मार्गदर्शन केले. पालक प्रतिनिधी राहुल गांधी आणि विजय गायकवाड यांनी शाळेच्या गुणवत्तेबद्दल आणि राबविल्या जाणाऱ्या उपक्रमांबद्दल समाधान व्यक्त केले.

अध्यक्षीय भाषणात ज्योतीताई केसकर यांनी नमूद केले की, शिक्षक आणि पालकांच्या एकत्रित प्रयत्नांमुळेच शाळेची प्रगती वेगाने होत आहे.

सूत्रसंचालन निरुपमा देशपांडे यांनी केले. आभार वैशाली सातपुते यांनी मानले. फलक लेखनासाठी अश्विनी मेंद्रे आणि सीमा कवाष्टे यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाच्या शेवटी प्रत्येक पालकाला वृक्षाचे रोप देऊन पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. शाळेच्या सर्व शिक्षकांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

## आनंदऋषीजी योगा सेंटर

### आनंदयोग मधील योग साधकांचे अभिप्राय

मी योगा क्लास मार्च महिन्यापासून जॉईन केला आहे. मला योगा क्लास जॉईन केल्यापासून दिवसभर आळस येत नाही. खूप फ्रेश वाटते. मला कपडे धुवायला बसायला खूप त्रास होता. माझे कंबर खूप दुखायचे. वाकता येत नव्हते. आता वाकता येते. माझा गुडघा खूप दुखायचा आता खूप प्रमाणात दुखायचा कमी आहे.

माझे वजन प्रत्येक महिन्याला वाढत होते. पण योगामुळे माझे वजन २ किलोने कमी झाले आहे. याचे मला खूप समाधान वाटते.

सुरुवातीला थोडा त्रास झाला पण आता खूप सवय झाली आहे योगाची. श्री. मेहेर सर खूप छान शिकवतात आणि योगा करायचा कंटाळा पण नाही. सरच खूप फ्रेश असतात. त्यांच्याकडे बघून माझा आळस पण जातो.



धन्यवाद सर ! धन्यवाद आनंदऋषीजी योगा. !

**– सौ. वैशाली पडोळे,** न्यू टिळक रोड

